# स्वशासनाची दिशा



मोहन हिराबाई हिरालाल

# स्वशासनाची दिशा

मोहन हिराबाई हिरालाल

वृक्षमित्र, गडचिरोली / चंद्रपूर

## मेंढा (लेखा), सायगाटा व सीड
## या पराक्रमी गाव-समाजांना समर्पित

पंचायत राज व ग्रामसभा हे आज चर्चेचे विषय झाले आहे. अनेक कार्यकर्ते, संस्था, संघटना या संदर्भात कामही करीत आहेत. १९९२ साली झालेल्या ७३ व्या घटना-दुरुस्ती पासून अनेक लेखक-विचारवंत यांचे लक्षही या विषयाने वेधून घेतले. बुद्धिजीवी वर्गाला त्यातून एक आशेचा किरण दिसला. तो धरून बरेच लिखाणही झाले; अजूनही होत आहे. १९९६ मध्ये केंद्र सरकारने आदिवासी भागातील पंचायत व्यवस्थेकरता दुरुस्ती सुचविणारा कायदा मंजूर केला, तेव्हा तर अनेकांना आभाळच हातात आल्यासारखे वाटले.

अंमलबजावणी होऊन परिणामांची खात्री झालेली नसतानाही कायद्यात झालेल्या काही तरतुदींचे लोकांना एवढे महत्त्व वाटते आहे, हे बघून माझे लक्ष याकडे वेधल्या गेले. ज्यांना या तरतुदी आशादायी वाटल्या किंवा अजूनही वाटत आहेत त्यांच्यात ढोबळमानाने दोन प्रकार दिसले. आता ग्रामपंचायतीच्या नियमित निवडणुका होतील; कायद्याने ग्रामसभेला मान्यता मिळाली; महिला, दलित व आदिवासी यांच्याकरता आरक्षणाची स्पष्ट तरतूद झाली, यामुळे समाधान मिळालेला एक वर्ग दिसतो. दुसऱ्या वर्गाचे एवढ्यावर समाधान नाही. त्यांना यातून छोट्या गावसमाजाच्या, मोहल्ला-टोल्याच्या ग्रामसभा अस्तित्वात येऊन तळातून लोकांचे सबलीकरण होईल, खऱ्या स्वराज्याच्या - ग्रामस्वराज्याचा दिशेने यातून वाटचाल सुरू होईल असे वाटते. १९९२ किंवा त्यानंतर झालेल्या कायद्यातील काही तरतुदींना मिळालेला हा प्रतिसाद बघून त्याआधीच्या अशा काही तरतुदी आहेत काय, हे बघण्याचा मी प्रयत्न केला. त्यातून १९६४ च्या ग्रामदान कायद्याची ओळख झाली. त्याची वैचारिक व सैद्धांतिक बाजू तपासताना म. गांधींनी १९०९ साली लिहिलेले 'हिंद- स्वराज्य' व १९४१ साली आचार्य विनोबा भावे यांनी लिहिलेले 'स्वराज्यशास्त्र' यांच्या वाचनातून मार्ग उजळला. मेंढा (लेखा), सायगाटा व सीड सारख्या गावांच्या अभ्यासातून त्याला अधिक स्पष्टता मिळत गेली. लोकांसोबत सुरू असलेल्या कामाची गरज म्हणून वेळोवेळी काही लिखाण झाले. ते या पुस्तिकेत एकत्रित

केले आहे. राजस्थानमधील सीड या गावासंबंधीचा काही भाग आमचे दिवंगत मित्र श्री. अनिल अग्रवाल व श्रीमती सुनीता नारायण यांना लिहिलेल्या व 'परिसर' पुणे ने मराठीत प्रकाशित केलेल्या 'हिरव्या खेड्यांचा देश' या पुस्तिकेतून व डॉ. उल्हास जाजू यांनी लिहिलेल्या व 'साम्ययोग' पाक्षिकात प्रकाशित झालेल्या लेखातून घेतला आहे.

'साम्ययोग' चे संपादक डॉ. पराग चोळकर यांचे सतत प्रोत्साहन व आत्मीय सहकार्य यामुळेच ही पुस्तिका आपल्यापर्यंत पोहचणे शक्य झाले. अंधारात पणतीचे काम ही पुस्तिका करेल एवढीच अपेक्षा.

**- मोहन हिराबाई हिरालाल**

---

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | स्वराज्याचा शोध --- --- | ४ |
| २. | ग्रामदान व पंचायत राज्य --- --- | १७ |
| ३. | ग्रामसभा सशक्तीकरण कायद्याचा एक मसुदा --- | २३ |
| ४. | स्वशासनाच्या दिशेने --- --- | २७ |
| ५. | मेंढा गावाची कहाणी --- --- | ३० |
| ६. | सीड : समूह-जीवनाचे मंगल दर्शन --- --- | ४१ |
| ७. | सीडचा अनुभव : ग्रामस्वराज्याची उपयुक्तता स्पष्ट --- | ४५ |

— १ —

# स्वराज्याचा शोध

कोणत्याही प्रकारची राजेशाही, हुकुमशाही किंवा एकाधिकारशाही नको ही गोष्ट जवळपास सर्वमान्य आहे. लोकप्रतिनिधींच्या सांसदीय लोकशाही राज्यव्यवस्थेकडून खूप अपेक्षा बाळगल्या गेल्या, पण अनुभवाअंती भ्रमनिरास होतो आहे. प्रत्यक्ष चटके बसल्यावर आम्हाला आज हे कळत आहे. पण आजपासून सुमारे ९३ वर्षांपूर्वीच ज्याला हे स्पष्टपणे उमगले होते असा एक द्रष्टा माणूस आम्हाला १९०९ साली लिहिलेल्या 'हिंद-स्वराज्य' या छोट्याशा पुस्तिकेतून इशारा देत होता. पण आम्ही त्यालाच वेडा ठरविले. त्याने व अनेक हुतात्म्यांनी ताणलेल्या स्वातंत्र्य आंदोलनाच्या कातडीवर सांसदीय लोकशाहीच्या शहाणपणाचे नगारे आम्ही बडवीत बसलो व फसलो.

'हिंद-स्वराज्य' मध्ये 'इंग्लंडची स्थिती' या शीर्षकाचे एक प्रकरण आहे. त्यात भारतातून इंग्रज गेल्यानंतर कशी राज्यव्यवस्था असावी, यावर चर्चा करण्यात आली आहे. क्रांतिकारी युवक म्हणतो की लोकशाहीची जननी अशा, लोकप्रतिनिधींच्या संसदेची, इंग्लंडच्या पार्लमेंटसारखीच आदर्श राज्यव्यवस्था आपल्या देशातही असावी. पण संपादक म्हणून या चर्चेत सहभागी झालेले महात्मा मोहनदास करमचंद गांधी दोन कारणांनी या विचाराला विरोध करतात. ते म्हणतात, "जिला तुम्ही लोकशाहीची जननी व जगातील आदर्श राज्यव्यवस्था म्हणत आहात त्या इंग्लंडच्या पार्लमेंटला मी नुकताच जवळून पाहून येत आहे. ती वेश्या व वांझ आहे. ती वेश्या आहे, कारण ती नेहमीच धनदांडग्यांच्या हातात राहते, व ती स्वतः होऊन कोणताही मूलभूत प्रश्न सोडविण्याचे सृजनात्मक काम करू शकत नाही म्हणून ती वांझ आहे."

लोकप्रतिनिधींच्या संसदेकरता वापरलेले हे दोन्ही कठोर शब्द स्त्रीवाचक असल्याबद्दल पुढे म. गांधींच्या महिला मित्रांनी आक्षेप घेतला. तेव्हा म. गांधींनी स्पष्ट केले की हे शब्द वापरून महिलांचा अनादर करण्याचा त्यांचा उद्देश नाही. पण जे सांगायचे आहे त्याकरिता इतर कोणतेच शब्द न सुचल्यानेच फक्त या शब्दांचा उपयोग त्यांनी केलेला आहे. समस्त महिलांची माफी मागून तेच शब्द

त्यांनी पुढेही कायम ठेवले. माझ्या मते पुरुषांच्या एका कमजोरीशी या प्रातिनिधिक केंद्रित सत्तेचे साम्य आहे. आपल्यासोबत असलेल्या स्त्रीचे संरक्षण करण्याइतके बलवान व शूरवीर आपण असावे अशी प्रत्येक पुरुषाची इच्छा असते. पुरुषाने असे असावे अशी स्त्रियांचीही अपेक्षा असते. पुरुषी अहंकाराने, जसे नाही तसे दाखविण्याचा प्रयत्न पुरुष करीत असतो. अगदी तसेच ही केंद्रित प्रातिनिधिक सांसदीय सत्ता स्वतःला सर्वकाही करू शकणारी व बलवान दाखविण्याचा प्रयत्न करीत असते. व लोकही सांसदीय सत्तेकडून तशीच अपेक्षा करीत असतात, स्वतःला दुबळे मानून सरकारच सर्वकाही करू शकते असे मानतात. थोडक्यात ही केंद्रीय सत्ता शेतात पक्ष्यांना भीती दाखविण्यासाठी लावलेल्या बुजगावण्यासारखी आहे. त्याला जे पक्षी अज्ञानामुळे भितात त्यांनाच ते भीती दाखवू शकते. ज्या पक्ष्यांना हे कळून चुकते की त्यात जीव नाही ते पक्षी मग बिनधास्तपणे त्या बुजगावण्याच्या डोक्यावर बसून मलमूत्र-विजर्सन करायलाही घाबरत नाहीत.

या नकारात्मक स्पष्टतेच्या पार्श्वभूमीवर सकारात्मक शोधाचे ऐतिहासिक कार्य महात्मा गांधींचे शिष्योत्तम आचार्य विनोबा भावे यांनी केले. त्यांच्या 'स्वराज्यशास्त्र' या लहानशा पुस्तिकेत सूत्ररूपाने या संबंधात अतिशय सुस्पष्ट अशी मांडणी केलेली आहे. त्यांनी मांडलेली 'सर्वायतन'ची कल्पना मानवी समाजाच्या नव्या टप्प्याची जणू नांदीच म्हणावी लागेल अशी आहे. भूदान आंदोलनाचा पुढील टप्पा म्हणून ग्रामदान आंदोलनाच्या संकल्पनेत विनोबांनी ही दिशा पकडण्याचा निश्चितच प्रयत्न केला. पण आंदोलनाने गावावर केंद्रित न राहता राज्यदान व पुढील भव्यतेच्या दिशेने मोहरा वळविल्याने 'ती' दिशा निसटली असेच म्हणावे लागेल. पुढे लोकनायक जयप्रकाश नारायण यांचे नेतृत्वाखाली बिहार प्रांतात सुरू झालेल्या संपूर्ण क्रांती आंदोलनात, अल्पकाळ का होईना, जनता सरकारच्या रूपाने या दिशेची एक वेगळी झलक बघायला मिळाली. पण नंतर निवडणुकीच्या धबडग्यात स्वराज्याची ही सुरेल तान हरवून गेली.

तो स्वराज्याचा सुस्वर काही अनुभवांच्या आधारे शोधण्याचा हा अल्पसा प्रयत्न आहे. गांधी-विनोबा-जयप्रकाश यांच्या खांद्यावर उभे राहून पुढचे बघत

व मेंढा (लेखा), सीड, सायगाटा यांसारख्या गावसमाजांच्या बोटाला (व बेटांनाही) धरून हा प्रवास सुरू आहे.

## रचना व कार्यपद्धती


दोष हे फक्त व्यक्तींचे व राष्ट्रीय सरकारांच्या धोरणांचेच नाहीत, तर ते रचनांचे व कार्यपद्धतीचेही आहेत. प्रातिनिधिक राष्ट्रीय सरकारे व त्यांच्या आंतरराष्ट्रीय संस्था ह्या सुद्धा म. गांधींच्या शब्दांतच सांगायचे तर, वेश्या व वांझ असल्यामुळे त्यांच्याकडून अपेक्षा बाळगणेच चूक आहे. तख्त, तलवार व तिजोरीच्या, म्हणजेच दंड, शस्त्र व पैशाच्या ताकदीने हे होणे अशक्य आहे. लोकशक्ती हाच यावर खरा पर्याय आहे. ही लोकशक्ती प्रगट होईल अशी रचना व कार्यपद्धती कशी असेल ? याची स्पष्टता, काय नको व काय पाहिजे या पद्धतीने करण्याचा आपण प्रयत्न करू या - (आकृती क्र. १ पहा)

| <u>नको</u> | <u>पाहिजे</u> |
|---|---|
| * व्यक्तींच्या प्रतिनिधींमार्फत गाव-समाजाचा कारभार म्हणजे 'आमच्या गावात आमचे सरकार' | * गाव-समाजाचा कारभार सर्व प्रौढ स्त्री-पुरुष मिळून, म्हणजेच 'आमच्या गावात आम्हीच सरकार' |
| * दोन गावे किंवा त्यापुढे व्यक्तींच्या प्रतिनिधींचे सरकार | * दोन गावे किंवा त्यापुढे गाव-समाजांच्या प्रतिनिधींचे सरकार |
| * बहुमताने निर्णय | * सर्वसहमतीनेच निर्णय |
| * जे खाली शक्य ते सुद्धा वर | * जे खाली शक्य ते वर नाही |
| * देशाचे नागरिकत्व | * गाव-समाजाचे नागरिकत्व |
| * विश्व-नागरिकत्व | * विश्व-सदस्यत्व |


आजच्या प्रातिनिधिक लोकशाही राज्यव्यवस्थेत राज्यरचनेचा आधारभूत घटक व्यक्ती मानण्यात आली आहे. वरील पर्यायी रचनेत व्यक्तीऐवजी गाव-समाज हा आधारभूत घटक असावा असे सुचविण्यात आले आहे. हा गाव-समाज म्हणजे काय ?

## आकृती क्र. १

### राज्य रचना




### राजकीय व आर्थिक सत्ता




*गाव-समाज*

गाव, मोहल्ला, टोला, पाडा, वाडी, तांडा, हाऊसिंग सोसायटी किंवा मोठी चाळ, जिथे लोक निवास करून राहतात व आपले दैनंदिन जीवन जगताना सर्वांशी संबंधित निर्णय सर्व प्रौढ स्त्री-पुरुषांच्या बैठकीत चर्चा करून सर्वसहमतीनेच घेतात, असा मानवी समाजाचा आधारभूत महत्तम सहभागी राजकीय-आर्थिक-सामाजिक घटक (युनिट) म्हणजे गाव-समाज.


असा गाव-समाज खालील तीन निकषांनी जास्त स्पष्ट होतो -

*१) लोकसंख्या* - ३०० ते ५०० व्यक्ती

*२) निवासस्थानांतील अंतर* - फक्त आवाज देताच लोक विचारविनिमय करायला वारंवार जमू शकतील इतके.

*३) निर्णय* - गाव-समाजाशी संबंधित सर्व निर्णय आम्ही ग्रामसभेत सर्व-सर्वसहमतीनेच घेऊ असा स्वयंनिर्णय.

**आकृती क्र. २**




*खुलासा* - वरील व्याख्येप्रमाणे असलेला लोकांचा निवासी समूह आदिवासी, ग्रामीण किंवा शहरी भागात राहणारा असला तरी, तो गाव-समाजच होय.

* महत्तम म्हणजे - जितके जास्तीत जास्त लोक वारंवार एकत्रित बसून विचारविनिमय करून निर्णय घेऊ शकतात तितके प्रौढ स्त्री-पुरुष असतील इतका मोठा, म्हणजे ३०० ते ५०० लोकसंख्या असलेला निवासी समूह.
* सहभागी म्हणजे - निर्णय-प्रक्रियेत सर्व स्त्री-पुरुषांचा, प्रतिनिधीमार्फत नव्हे तर सरळ, सहभाग असलेला.
* गाव-समाजाशी संबंधित सर्व निर्णय सर्व स्त्री-पुरुषांच्या सभेत सर्व-सहमतीनेच.
* दोन किंवा त्यापेक्षा जास्त गाव-समाजांशी संबंधित मुद्यांवर निर्णय घ्यायचा असेल तर तो त्या गाव-समाजांचे सर्वसहमतीने निवडलेले प्रतिनिधी सर्वसहमतीनेच घेतील.

*ग्रामसभा*

* गाव-समाजातील सर्व प्रौढ स्त्री-पुरुषांची सभा.
* ग्रामसभेला प्रत्येक घरातून किमान एक स्त्री व एका पुरुषाने येणे बंधनकारक.

*ग्रामसमाज-नागरिकत्व*

* नव्या रचनेमध्ये गाव-समाज व जग यांच्या दरम्यान अनेक गावांचा मिळून झालेला देश किंवा राष्ट्र हा एक प्रातिनिधिक घटक असेल. पण नागरिकत्व देशाचे असणार नाही. ते गाव-समाजाचे असेल.
* जे जन्मापासून रहिवासी नाहीत, त्यांना गावसमाज-हद्दीत दीर्घकालीन निवासाकरिता गावसमाजाची पूर्व-परवानगी आवश्यक असेल.
* प्रत्येकाला जीवनावश्यक वस्तू मिळविण्यासाठी नैसर्गिक संसाधनांवर (जल, जंगल, जमीन इ.) समान अधिकार असेल. त्या संसाधनांवर कुणाचीच मालकी असणार नाही.
* नैसर्गिक संसाधनांच्या व्यवस्थापनाची समान सामूहिक जबाबदारी प्रत्येकाला स्वीकारावी लागेल.
* गावातील झगडा-भांडण गावातच सर्वसहमतीने मिटवणे बंधनकारक असेल. कोणत्याही परिस्थितीत शारीरिक दंड किंवा मृत्युदंड या शिक्षा असणार नाहीत.

*विश्व-सदस्यत्व*

* प्रत्येकाला जगात कुठेही फिरण्याचा, माहिती व ज्ञान मिळविण्याचा, आपली मते मांडण्याचा व अल्पकाळ निवास करण्याचा अधिकार असेल.
* संपूर्ण जगाचे चलन एकच असेल. त्यामुळे जगात कुठेही वस्तूंच्या किंमती सारख्याच असतील.
* श्रमाची किंमत जगभर सारखीच असेल.
* प्रत्येक गावसमाजाचा नागरिक हा विश्व-सदस्य असेलच.
* जगातील प्रत्येकाने कुठल्या-ना-कुठल्या गावसमाजाचे नागरिक असणे आवश्यक असेल.

*नैसर्गिक संसाधने - जल, जंगल व जमीन*

* मालकी कुणाचीच नाही.
* व्यवस्थापन (मॅनेजमेंट) - त्यावर जगण्यासाठी अवलंबून असलेल्या गाव-समाजाच्या हातात.
* पहिला अधिकार जगण्यासाठी, मग व्यापार व उद्योग.
* पाणलोट क्षेत्र-आधारित चिरस्थायी आर्थिक विकासाचे नियोजन गाव-पातळीवर, गाव-समाजाद्वारे. पाणी जमिनीच्या प्रमाणात नव्हे, तर प्रत्येकाला समान उपलब्ध.
* प्रत्येक व्यक्तीला समान जबाबदारी व समान हक्क.

*भांडवल*

* भांडवल कुणाच्याच मालकीचे नाही.
* प्रत्येक व्यक्तीने कुठल्या-ना-कुठल्या बचतगटाचा सदस्य असणे आवश्यक.
* प्रत्येकाला बचतगटामार्फतच कर्ज पुरवठा.
* जागतिक पातळीवर व्याजाचे दर सारखेच.
* नियोजित वेळेत कर्ज परत करणाऱ्यांची पत दुप्पट.
* व्यापार व उद्योगाकरिता बचतगटामार्फतच भांडवल-उभारणी. परतफेडीला बचतगट जबाबदार.

*बाजार-नियंत्रण*

* उत्पादन - प्राथमिकत: स्वत:च्या व परिसरातील लोकांच्या गरजांच्या पूर्तीसाठी, जितकी मागणी तितकेच उत्पादन.
* आमच्या गावसमाजात किंवा परिसरात उत्पादन होणारी वस्तूच आम्ही प्राथमिकतेने वापरू असा स्वयंनिर्णय.
* जीवनावश्यक वस्तूंकरिता जास्तीत जास्त स्वावलंबन.
* उद्योगाकडून कच्च्या मालाची मागणी झाल्यास स्वत:च्या अटींवर पुरवठा.

*अटींची दिशा*

* कच्च्या मालाऐवजी गावात किंवा परिसर-पातळीवर, जितकी शक्य तितकी प्रक्रिया (व्हॅल्यू-ॲडिशन) करून माल-पुरवठा.
* कच्चा माल-उत्पादक म्हणून उद्योगात भागीदारी.
* कच्चा माल-उत्पादक ३३% व कामगार ३३% अशा प्रकारे एकूण ६६% भागीदारी.
* सरकारी तत्त्वावर स्वतः गाव-समाज-समूहाद्वारे उद्योगनिर्मिती व व्यवस्थापन. व्यक्ती सहकारी संस्थेचे सदस्य असणार नाहीत, बचत गटच असतील. किंवा गावसमाजामार्फत बचत गट-आधारित उद्योग-उभारणी.

## वाटचालीची दिशा

आज आहे त्या परिस्थितीतून नव्या दिशेने वाटचाल कशी सुरू होणार ? ज्ञानाच्या सहभागी-सामूहिक प्रक्रियेपासून सुरुवात होईल.


- ज्यांना अभ्यासात आवड आहे, अशांनी गट बनवून अभ्यासासाठी अभ्यास करणे.
- अभ्यास-प्रक्रियेला निर्णय-प्रक्रियेपासून जाणीवपूर्वक अलग ठेवणे आवश्यक.
- जगातील आधुनिकतम ज्ञान व विज्ञानावर आमचा अधिकार आहे, असे मानून तो मिळविण्याचा प्रयत्न.
- ज्ञानप्राप्तीसाठी जगातील कुणाशीही बोलण्याची मुभा.
- मते, पक्ष, विचारधारा, पंथ, धर्म, वर्ण, जात, लिंग, कशाचेही बंधन नाही.
- फक्त एकमेकांचे बोलणे ऐकून घेण्याचे व समजून घेण्याचे धैर्य आवश्यक. दुसऱ्याचेही खरे असू शकते या वैज्ञानिक दृष्टिकोनाचा स्वीकार.
- कुठल्याही विषयाचे बंधन नाही. त्या-त्या वेळेला अभ्यास-मंडळाला जो विषय महत्त्वाचा वाटेल, त्यावर चर्चा-अभ्यास.
- अभ्यासामुळे ज्ञान-विकास. पण निर्णय कधीही अभ्यासमंडळात नाही.

- निर्णय ग्रामसभेत सर्वसहमतीनेच. निर्णय-प्रक्रियेत गाव-समाजाबाहेरील व्यक्तींना सहभागी होता येणार नाही.

* *कृती* - ग्रामसभेच्या निर्णयाप्रमाणे ठरलेल्या कृतीत, तो निर्णय मान्य असलेल्या गाव-समाजाबाहेरील व्यक्तींनाही सहभागी होता येईल.

* *ज्ञान-निर्णय-कृतीची चक्रीय प्रक्रिया* - नेहमीच ज्ञान किंवा अभ्यासापासूनच सुरुवात होईल असे नाही. ती कधी निर्णय किंवा कृतीपासूनही होऊ शकेल. ती कुठूनही झाली तरी तिचे चक्र पूर्ण होत राहील याकडे लक्ष द्यावे लागेल. (अधिक स्पष्टतेसाठी आकृती क्र. ३ बघा.)

आकृती ३




*संपूर्ण गाव-समाजाचे बचत गट बनणे या आर्थिक कार्यक्रमापासूनही सुरुवात होऊ शकेल*

- गाव-समाजातील सर्व व्यक्तींचे (स्त्री व पुरुष दोहोंचे) दहा-दहा जणांचे बचत गट बनवून त्यांचे बचत गटाच्या नावाने बँकेत खाते उघडावे.

– सहा महिने नियमित बचत केल्यास तो गट बँकेकडून कर्ज मिळण्यास पात्र होतो.
– आम्ही सबसिडी घेणार नाही, कर्ज घेऊ; त्याचा योग्य उपयोग करू व फायदा झाल्यावर ते कर्ज परत करू असे लोकांनी विचाराअंती, स्वतःच्या फायद्याचे वाटल्यास, ठरवावे.
– बँकांनी बचत गटांना गॅरंटी व तारण न मागता कर्ज द्यावे असे रिझर्व्ह बँकेचे आदेश आहेत.
– बचत गटांनी ते कर्ज आपल्या सदस्यांना द्यायचे आहे. गट स्वतःकरताही वेगळे व्याज आकारू शकतो. परतफेडीकरिता व्यक्ती नव्हे, तर गट बँकेला जबाबदार असतो.
– गटांनी वेळेवर कर्ज परत केल्यास त्यांची पत सर्वसाधारणपणे दुप्पट होते.
– ज्या कामाकरता सरकारकडून पैसे मिळू शकत नाहीत, अशी गाव-विकासाची मोठी सामूहिक कामेही सर्व बचत गटांत एकूण कर्ज विभागून घेऊन करता येणे शक्य आहे.
– बचत गट हेच अभ्यास-मंडळ सुद्धा व्हावेत, म्हणून प्रयत्न होऊ शकतात. असे झाले तरी संपूर्ण गावाचे अभ्यास-मंडळ वेगळे असेलच.

*सहयोगी मित्र आवश्यक*

सर्वसहमतीने निर्णय घेणाऱ्या गाव-समाजात लोकशक्ती प्रगट होते. हा गाव-समाज म्हणजे बाकी जगापासून संपूर्णपणे अलग, स्वतंत्र असा घटक नव्हे. तो अपरिहार्यपणे जगाचाच एक भाग आहे. बाहेरील जग व व्यवस्थेशी जिथे संबंध येतो, तिथे बऱ्याचदा हा गाव-समाज कमी पडू शकतो. ज्याला बाहेरील जग व व्यवस्था, त्यांची रीत व भाषा माहिती आहे, असा एक सहयोगी मित्र या गाव-समाजाला आवश्यक आहे. तो कधी त्याच गावातला असेल, कधी जवळपासच्या गावाचा असेल, तर कधी दूरच्या गावाचाही असू शकेल. सायगाटा, सीड व मेंढा (लेखा) या तीनही गावांच्या अनुभवावरून अशा सहयोगी मित्रांचे प्रक्रियेतील महत्त्व लक्षात येते. अशी सहयोगी मैत्री तो गाव-समाज व ती व्यक्ती दोघांनाही समृद्ध करणारी असते.

### *जशा व्यक्ती वेगळ्या, तसेच गाव-समाजही वेगळे असतात*

व्यक्ती वेगळ्या असतात, कारण त्या मुळातूनच वेगळ्या असतात. त्यांचा पिंडच वेगळा असतो. आवड-निवड, स्वभाव वेगळा असतो, म्हणून त्या तशा असतात, हा आपला सर्वसाधारण अनुभव आहे. जशा व्यक्ती वेगळ्या असतात तसेच गावसमाजही वेगळे असतात. कधी सहजच अशा अनुरूप व्यक्ती व गाव-समाजांची जोड जमते. धैर्याने, प्रयत्नपूर्वकही असा एक-दुसऱ्याचा शोध घेता येतो. अशी सहयोगी मित्र व्यक्ती व सर्वसहमतीने निर्णय घेणारा गावसमाज यांच्या संयोगातून लोकशक्तीची प्रचंड ऊर्जा प्रगट होऊ शकते. दोघे एकमेकांची शक्ती वाढवतात. ज्ञान-निर्णय-कृती-प्रक्रियाचक्रात बाहेरील सहयोगी मित्र व्यक्तीचे स्थान निर्णय-प्रक्रियेत नसेल. तिचा अभ्यास-मंडळाच्या माध्यमातून ज्ञान-प्रक्रियेत संपूर्ण सहभाग असेल, तर कृतीमध्ये सहमती असल्यास ती सहभागी होईल. आकृती क्र. ३ मध्ये तिरप्या रेषांनी बाहेरील सहयोगी मित्राचे प्रक्रियेतील स्थान दर्शविले आहे.

### हे स्वप्नरंजन नव्हे

* मेंढा (लेखा) (ता. धानोरा, जि. गडचिरोली), सायगाटा (ता. ब्रह्मपुरी, जि. चंद्रपूर) व सीड (वाया कानोड, जि. उदयपुर, राजस्थान) ही गावे प्रत्यक्षात या दिशेने मार्गक्रमण करीत आहेत. या गावसमाजांसोबत सहयोगी मित्राची भूमिका पार पाडणाऱ्या व्यक्ती पुढीलप्रमाणे - मेंढा (लेखा) - मी स्वतः (मोहन हिराबाई हिरालाल), सायगाटा - श्री. सूर्यभान खोब्रागडे, सीड - श्री. रामेश्वरप्रसाद. हे सेठवाना या सीडपासून जवळच असलेल्या गावचे शेतकरी. माझे गाव मेंढा (लेखा) पासून सुमारे १०० कि. मी. दूर आहे. जंगल व लोक या विषयावरील सहभागी अभ्यास-प्रकल्पामुळे माझी मेंढा (लेखा) शी ओळख व पुढे मैत्री झाली. [ मेंढा (लेखा) गावच्या प्रवासाची ओळख करून घेण्याकरिता वाचा - 'मेंढा गावाची कहाणी' (पृ. ३०)]
* सीड गावाची ओळख करून घेण्यासाठी वाचा - 'सीड : समूह-जीवनाचे मंगल दर्शन' व 'सीडचा अनुभव : ग्रामस्वराज्याची उपयुक्तता स्पष्ट' (पृ. ४१, पृ. ४५)

* सायगाटा - हे नागपूर-ब्रह्मपुरी हायवेवर असलेले लहानसे गाव. ब्रह्मपुरीच्या अलीकडे ६ कि. मी. वर डाव्या हाताला पुनर्जीवित झालेले जंगल दिसते ते या गावचेच. सवर्ण हिंदू, आदिवासी व दलित मिळून आठ जातींचे लोक गावात आहेत. भारतातील गावसमाजाचे खरे प्रतिनिधी असे हे गाव. तरीही वेगळे.
- गावात दलित अल्पसंख्येत असले तरी गावाचे नेतृत्व एका दलित समाजातील व्यक्तीकडेच सर्वसहमतीने आहे.
- परिसरात सवर्ण हिंदू व दलितांमध्ये दंगल उसळली, तरी ती या गावात पसरली नाही.
- गावाचे संपूर्ण जंगल उजाड झाले होते. गावातील ४० पेक्षा जास्त व्यक्ती मोळ्या विकून पोट भरत होत्या. झाडे संपल्यावर खोडे (मुळे) विकून जगणे सुरू होते. अशा परिस्थितीतून १९७८ सालापासून स्वयंनिर्णयाने गावसमाजाने आपले जंगल स्वतः राखायला सुरुवात केली.
- त्याकरिता वन विभागाशीही स्वबळावर यशस्वी लढा दिला.
- कुठेही कुंपण नसताना आज वाढलेले त्यांचे वन बघण्यासारखे आहे.
- गावाच्या वनाचे व्यवस्थापन गावाने आपल्या ताब्यात घेतले आहे.
- गावातील स्त्रियांची व गरीबांची ताकद वाढली आहे.
- सामूहिक गोठ्याचा अभिनव उपक्रम गाव राबवीत आहे.

### *शहरी भागातील व व्यापक उदाहरणे*

ही झालीत ग्रामीण भागातील तीन गावांची उदाहरणे. त्यावरून कुणाला असे वाटू शकते की हे फक्त आदिवासी व ग्रामीण भागातच शक्य आहे. पण शहरी भागातही या दिशेने वाटचाल घडल्याची उदाहरणे आहेत. पाकिस्तानच्या कराची महानगरामध्ये औरंगी नावाची मोठी झोपडपट्टी आहे. मुंबईमधील धारावीसारखी. त्यांची स्वच्छता-व्यवस्थेची भयानक समस्या होती. डॉ. मुश्ताक अली हे समाजशास्त्रज्ञ व अरीफ हसन हे आर्किटेक्ट यांनी, आंधळ्यासारखे मार्ग शोधत शोधत या झोपडपट्टीत घुसायचे व लोकांसोबत वेगळ्या पद्धतीने काम करायचे ठरविले. त्यातून लोकांसोबत बोलणे-अभ्यास सुरू झाला. मोहल्ला

समित्या बनल्या. लोकांनीच मित्रांच्या मदतीने योजना आखली, पैसा उभा केला व स्वतःची समस्या स्वतःच सोडवून घेतली.

पुण्यातील कोथरूड भागात हॅपी कॉलनी आहे. ओनरशिप फ्लॅट्स बनणे सुरू होते. काही मध्यमवर्गीय कुटुंबे रहायला आली होती. एका कुटुंबाच्या लक्षात आले की कॉलनीजवळच मुरुमाच्या खाणी आहेत व तिथून कॉन्ट्रॅक्टर मुरुमाची ट्रकने वाहतूक करीत आहे. त्यांनी विचार केला, अजून आपल्या कॉलनीचे रस्ते बनायचे आहेत; त्यासाठी आपल्याला मुरुम लागेल, तो मग आपण कुठून आणणार ? त्यांनी शेजारी बोलायला सुरुवात केली. लोक एकत्रित येऊन बोलायला लागले. अभ्यास सुरू झाला. कागदोपत्री लढाईत दम नाही, हे लक्षात आल्यावर ही मध्यमवर्गीय कुटुंबे बायकामुलांसह रस्त्यावर उतरली. मुरुमाचा ट्रक अडवला. शासनाला कॉन्ट्रॅक्टरची लीज रद्द करावी लागली. या लढ्यातून निर्माण झालेल्या लोक-ऊर्जेचा उपयोग त्यांनी आपली स्वच्छता-व्यवस्था अभिनव पद्धतीने बसविण्याकरिता केला.

बाबरी मशीद प्रकरणानंतर उसळलेली दंगल फक्त मोहल्ला समित्यांमुळे भिवंडी व भागलपूर सारख्या तणावग्रस्त शहरांत पसरली नाही, हे याच दिशेचे उदाहरण आहे. गडचिरोली जिल्ह्यातील १५० गावांनी प्रचलित कायदा मोडून आपल्या गावातील बेकायदेशीर दारू बंद करण्याचा केलेला पराक्रम याच दिशेचा परिचायक आहे. या १५० जागृत गाव-समाजांच्या सर्वसहमतीने निवडलेल्या प्रतिनिधींची निर्णयप्रक्रिया बांधण्यात आम्ही चुकलो. अन्यथा गावसमाजांच्या प्रतिनिधींच्या शक्तीचाही एक वेगळा प्रयोग इथे होऊ शकला असता.

असे अनेक गाव-समाज व मोहल्ले स्वयंप्रेरणेने वाटचाल करीत असण्याची शक्यता आहे. त्यांच्या स्वतःच्याच जगण्याचा हा एक भाग असल्याने, आपण काही विशेष-वेगळे करीत आहोत असा अभिनिवेश व त्यामुळे येणारा अहंकारही तिथे नसेल. म्हणून प्रचार व प्रसार माध्यमांत प्रसिद्धीही असणार नाही. ज्या वेगळ्या व्यक्ती आहेत, त्यांनीच अशी वेगळी गावे-मोहल्ले शोधून त्यांच्यासोबत स्वतःला जोडून घ्यावे लागेल. असा गाव-समाज व सक्षम सहयोगी मित्र व्यक्ती मिळून साकार होईल गाव किंवा मोहल्ला गणराज्य. अशा

अनेक गाव-गणराज्यांचे मिळून बनेल राज्य व राज्यांचे मिळून बनेल जागतिक राष्ट्र. संपूर्ण पृथ्वी हेच एक राष्ट्र असेल. प्रत्येक व्यक्ती नागरिक या नात्याने कोणत्या-ना-कोणत्या गाव किंवा मोहल्ला गणराज्याशी बांधलेली असेल व दुसरीकडे विश्व-सदस्य म्हणून पृथ्वीला जबाबदार असेल. सर्वसहमतीने निर्णय घेण्याचा स्वयंनिर्णय ही राज्यशास्त्रीयदृष्ट्या आधुनिकतम गोष्ट होय; हे म्हणजे कोणत्या तरी जुन्या गोष्टीचे पुनरुज्जीवन नव्हे. या दिशेने वाटचाल सुरू करणे, एक पाऊल उचलणे आपल्या प्रत्येकाच्या आवाक्यात आहे. आपला गाव-समाज किंवा मोहल्ल्यापासून व त्याआधी स्वत:पासूनच प्रत्येकाला प्रारंभ करता येईल.

## – २ –

## ग्रामदान व पंचायत राज्य

ग्रामस्वराज्याकडे जाण्यासाठी आचार्य विनोबा यांनी पन्नास वर्षांपूर्वीच ग्रामदानाची कल्पना व योजना पुढे ठेवली होती. ग्रामदान म्हणजे गावासाठी दान. याचा ढोबळ आराखडा असा आहे -

१. गावातील जमीन-मालकांनी जमिनीवरचा मालकी हक्क ग्रामसभेला - जी गावातील सर्व प्रौढ स्त्री-पुरुषांची मिळून बनते - अर्पण करावा.

२. या जमिनीपैकी पाच टक्के जमीन भूमिहीनांसाठी काढून त्यांना वाटण्यात यावी.

३. बाकी जमीन मूळ मालकांकडेच राहील. ते वंशपरंपरा तिच्यात काम करून उत्पादनाचा उपभोग घेऊ शकतील.

४. मात्र जमीन विकायची झाल्यास गावातच, ग्रामसभेच्या अनुमतीनेच विकता येईल.

५. गावातील सर्वजण वार्षिक उत्पन्नाचा ४० वा भाग गावास देतील. त्यातून निर्माण होणाऱ्या ग्रामकोषातून गावाची कामे होतील.

६. ग्रामसभा सर्वसहमतीने गावाचा कारभार पाहील व विकास करेल. याबद्दलचे नियम तीच ठरवेल.

यानुसार देशात वेगवेगळ्या राज्यांत ग्रामदान कायदे बनले आहेत व अनेक गावे या कायद्यांखाली नोंदली गेली आहेत. महाराष्ट्रातही महाराष्ट्र ग्रामदान

कायदा (१९६४) लागू आहे व त्याखाली १९ गावे नोंदली गेली आहेत.

ग्रामदान व सरकारी पंचायत राज्य यांतील फरक स्पष्ट करताना विनोबा म्हणाले होते -

*"देशात पंचायत राज्य आले आहे. त्यामुळे ग्रामस्वराज्य स्थापन होईल असे म्हटले जाते. परंतु हा निव्वळ भ्रम आहे.*

*पंचायत राज्याचा उद्देश आहे, सत्तेचे विकेंद्रीकरण. दिल्लीच्या केंद्रित सत्तेचा एक भाग राज्यांना मिळाला, आणि एक भाग गावांत पंचायतींपर्यंत आला. दिल्लीच्या सत्तेचे अशा प्रकारे वाटप झाले.*

*परंतु, दगडाचे छोटे-छोटे तुकडे कराल, तरी त्याच्यातून काही लोणी निर्माण होणार नाही. ते दगडच राहतील. केंद्रित सत्तेचेही कितीही तुकडे केले तरी ती केंद्रित सत्ताच राहील. जोपर्यंत प्रेमाच्या आधारावर ग्रामसभा बनत नाही, तोपर्यंत विकेंद्रित अहिंसक व्यवस्था स्थापन करण्याची अपेक्षा पूर्ण होऊ शकत नाही.*

*मी याला एक नाव दिले आहे – विकेंद्रित शोषण-योजना. केवळ एका केंद्रातून शोषण करायचे म्हटले तर ते पूर्ण क्षमतेसह केले जाऊ शकत नाही. म्हणून सक्षम विकेंद्रित शोषणासाठी पंचायती राज्याची योजना बनली. मात्र अशा प्रकारे पंचायती सत्ता किंवा मत्सर यांच्या अधीन झाल्या, तर पूर्ण समाज-शरीर जर्जर होऊन जाईल. इच्छा तर तशी नाही, परंतु परिणाम उद्देशापासून अगदी वेगळा येत आहे, आणि भारताचे शरीर नखशिखांत दूषित होत आहे.*[१]

*आजच्या ग्रामपंचायतीत २५०० लोक असतात. त्यात ८-१० गावे असतात. ती सत्तेच्या आधारावर बनलेली आहे, प्रेमाच्या आधारावर नाही, म्हणून प्रत्येक गावातले लोक तिला आपल्याकडे खेचतील. अशा प्रकारे ग्रामपंचायत एक भांडणाची जागा बनू शकते. हे मी कल्पनेने म्हणत नाही. मी सगळा भारत पाहिला आहे. पंचायतीत बहुमताने काम होते. तेव्हा प्रत्येक जण आपले बहुमत बनवण्याचा प्रयत्न करतो. म्हणून गावागावात भांडणे निर्माण होतात.*[२]

*ग्रामदानानंतरचे सगळ्यात पहिले काम आहे, ग्रामसभा बनवणे.*

*गावातील प्रत्येक प्रौढ व्यक्ती ग्रामसभेची सदस्य असेल. ग्रामसभा ग्राममातेप्रमाणे काम करेल. गावाचे चित्र समोर ठेवून, गाव शेवटी एक परिवार बनेल या दृष्टीने ग्रामसभा विचार करेल. ग्रामसभा सर्वांचे रक्षण करेल. ग्रामसभा दुर्गा आहे. गावातल्या प्रत्येक व्यक्तीची शक्ती तिला मिळते. गावकऱ्यांतर्फे ग्रामसभा सरकारशी, इतर संस्थांशी, गावाच्या बाहेरच्यांशी, सगळ्यांशी व्यवहार करेल.*

*ही ग्रामसभा प्रेम आणि त्यागाच्या आधारावर उभी राहील. ग्रामसभेची शक्ती प्रेमाची शक्ती आहे. ग्रामसभेला मी आईची उपमा दिली आहे. ग्रामसभा सर्वानुमतीने काम करेल. गावाच्या एकतेची किंमत देऊन मताग्रह ठेवू नये हे जेव्हा ध्यानात येईल तेव्हा सर्वानुमती कठीण वाटणार नाही.*[३]''

( १ विनोबा साहित्य खंड १६, पृ. १८९-९०
२ भूदान-यज्ञ, २३.३.६२
३ विनोबा-साहित्य खंड १६, पृ. २०४-०५ )

*(ग्रामदान कायद्याबाबत अधिक माहितीकरिता बघा - पुस्तिका 'ग्रामदानाची ओळख' ले. डॉ. पराग चोळकर, प्रकाशक - परंधाम प्रकाशन, पवनार, जि. वर्धा, किं. १० रु.)*

## पंचायत राज ७३ वी घटना दुरुस्ती, १९९२ व आदिवासी स्वशासनाचा कायदा, १९९७ च्या संदर्भात ग्रामदान कायदा १९६४ ची वैशिष्ट्ये

### १. वैशिष्ट्ये

१.१ हा असा एकमेव कायदा आहे की ज्यामुळे निर्णय घेण्याची शक्ती असलेली खरी ग्रामसभा कायद्याने अस्तित्वात येऊन सरळ लोकांच्या हातात सत्ता येऊ शकते.

१.२ आजच्या गट ग्राम-पंचायतीमधील घटक गाव असला तरी तो गाव ग्रामदानी झाल्यास त्या गावातील सर्व मतदारांचे ग्राममंडळ

(ग्रामसभा) बनून त्याला स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा प्राप्त होतो.

१.३ गावहद्दीतील जल, जंगल, जमीन ग्रामसभेच्या अधिकाराखाली येतात.

१.४ जमिनीवरील व्यक्तिगत मालकीहक्क संपून सर्व जमीन गावाच्या मालकीची होते.

१.५ उत्पादनाचे साधन म्हणून प्रत्येकाला जमीन मिळते, पण ती त्याला विकता येत नाही. त्यामुळे जमिनीचे आज संपत्ती म्हणून बनलेले रूप जाऊन 'उत्पादनाचे साधन' हे खरे रूप प्रस्थापित होते.

१.६ गावातील प्रत्येकाला उत्पादनाचे साधन म्हणून जमीन मिळण्याचा नैसर्गिक हक्क आहे हे तत्त्व मान्य करणारी व्यवस्था कायद्याने अस्तित्वात येते.

१.७ ग्रामसभा बनवून गावाची सत्ता गावाच्या हातात घेण्याकरता अभिक्रम गावाच्या हातात येतो.

१.८ जमिनीचा २० वा हिस्सा व उत्पन्नाचा ४० वा हिस्सा गावाला दान देण्याचा संकल्प करून तो पूर्ण केल्यामुळे समता, बंधुता व न्यायाच्या दिशेने प्रत्यक्ष एक पाऊल पडून वाटचाल सुरू होते.

१.९ कायद्याने अधिकृतपणे ग्रामकोष तयार होतो व तो ग्रामसभेच्या अधीन राहतो.

१.१० गावाबाहेरील सरकारे व बँकांसारख्या आर्थिक संस्थांकडून अनुदान किंवा कर्ज मिळण्याचा फायदा कायम राहतो, पण त्यांचे गावावरील नियंत्रण न्यूनतम होऊन गावाचा कारभार स्वतः चालविण्यासाठी संधी ग्रामसभेला मिळते.

१.११ जमिनीचा रेकॉर्ड ग्रामसभेच्या ताब्यात येतो. सात-बाराचा उतारा ग्राममंडळाचा अध्यक्ष देऊ शकतो. गावावर प्रभावी नियंत्रण ठेवणारा बाहेरील व्यवस्थेचा प्रतिनिधी पटवारी किंवा तलाठी नष्ट होतो.

१.१२ सात-बारामध्ये संपूर्ण गावाचे मिळून जमिनीचे एकच खाते बनते, त्यामुळे गाव म्हणजे एक कुटुंब ही भावना वाढण्यास मदत होते.

१.१३ गावातील दारू व इतर व्यसने यांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्याची सत्ता सरळ ग्रामसभेच्या हातात येते.

१.१४ आदिवासी क्षेत्र असेल तर आदिवासी स्वशासनाच्या कायद्यामुळे पंचायत किंवा गट ग्रामपंचायतीच्या तथाकथित ग्रामसभेला मिळालेले सर्व अधिकार या ग्रामदानी गावाच्या खऱ्या ग्रामसभेला आपोआपच मिळतात. पण त्यातील दोष चिकटत नाहीत. उलट गाव व ग्रामसभेची व्याख्या बरोबर न केल्याचा त्यातील प्रमुख दोष दूर होतो.

## २. संधी

ग्रामदानी कायद्यात तरतूद नसली तरी त्यामुळे पुढील गोष्टी स्वयंनिर्णयाने करण्याची संधी प्राप्त होते -

२.१ गावातील ७५% शेतकऱ्यांनी जमीन दान करण्याचा संकल्प केला तरी ग्रामदान होऊ शकते. पण असे करू नये. त्यामुळे २५% लोकांवर निर्णय लादल्या जाऊन सर्वसहमतीने निर्णय घेणारी जिवंत शक्तिशाली ग्रामसभा निर्माण होण्यात अडचण निर्माण होते. गावातील १००% लोक संकल्प करणार नाहीत, तोपर्यंत कायद्याने शक्य असले तरी ग्रामदान घडवून आणू नये. धीर धरावा.

२.२ १००% लोकांची सहमती झाल्यावर, जरी जमिनीच्या खात्यात कुटुंबांतील स्त्रियांची नावे नसली तरी, संकल्पपत्र तयार करताना त्यावर कुटुंबातील सर्व स्त्री-पुरुष मतदारांची नावे लिहून सह्या घ्याव्या.

२.३ गावाशी संबंधित सर्व निर्णय ग्रामसभेत सर्वसहमतीनेच होतील असा स्वयंनिर्णय ग्रामसभेने घेतल्यास गावातील सर्वांत दुर्बल घटक अशा गरीब, दलित, आदिवासी व स्त्रियांना निर्णय-प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी प्राप्त होते.

२.४ कोरमकरता एकूण महिला मतदारांच्या ५०% महिलांच्या उपस्थितीची अट ठेवल्यास गावाच्या निर्णय-प्रक्रियेत महिला दबावगट म्हणून प्रभावी कार्य करू शकतात.

२.५ गाव ३०० लोकसंख्येपेक्षा मोठे असल्यास प्रत्येकी २०० ते ३००

(ग्रामसभा) बनून त्याला स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा प्राप्त होतो.

१.३ गावहद्दीतील जल, जंगल, जमीन ग्रामसभेच्या अधिकाराखाली येतात.

१.४ जमिनीवरील व्यक्तिगत मालकीहक्क संपून सर्व जमीन गावाच्या मालकीची होते.

१.५ उत्पादनाचे साधन म्हणून प्रत्येकाला जमीन मिळते, पण ती त्याला विकता येत नाही. त्यामुळे जमिनीचे आज संपत्ती म्हणून बनलेले रूप जाऊन 'उत्पादनाचे साधन' हे खरे रूप प्रस्थापित होते.

१.६ गावातील प्रत्येकाला उत्पादनाचे साधन म्हणून जमीन मिळण्याचा नैसर्गिक हक्क आहे हे तत्त्व मान्य करणारी व्यवस्था कायद्याने अस्तित्वात येते.

१.७ ग्रामसभा बनवून गावाची सत्ता गावाच्या हातात घेण्याकरता अभिक्रम गावाच्या हातात येतो.

१.८ जमिनीचा २० वा हिस्सा व उत्पन्नाचा ४० वा हिस्सा गावाला दान देण्याचा संकल्प करून तो पूर्ण केल्यामुळे समता, बंधुता व न्यायाच्या दिशेने प्रत्यक्ष एक पाऊल पडून वाटचाल सुरू होते.

१.९ कायद्याने अधिकृतपणे ग्रामकोष तयार होतो व तो ग्रामसभेच्या अधीन राहतो.

१.१० गावाबाहेरील सरकारे व बँकांसारख्या आर्थिक संस्थांकडून अनुदान किंवा कर्ज मिळण्याचा फायदा कायम राहतो, पण त्यांचे गावावरील नियंत्रण न्यूनतम होऊन गावाचा कारभार स्वतः चालविण्यासाठी संधी ग्रामसभेला मिळते.

१.११ जमिनीचा रेकॉर्ड ग्रामसभेच्या ताब्यात येतो. सात-बाराचा उतारा ग्राममंडळाचा अध्यक्ष देऊ शकतो. गावावर प्रभावी नियंत्रण ठेवणारा बाहेरील व्यवस्थेचा प्रतिनिधी पटवारी किंवा तलाठी नष्ट होतो.

१.१२ सात-बारामध्ये संपूर्ण गावाचे मिळून जमिनीचे एकच खाते बनते, त्यामुळे गाव म्हणजे एक कुटुंब ही भावना वाढण्यास मदत होते.

१.१३ गावातील दारू व इतर व्यसने यांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्याची सत्ता सरळ ग्रामसभेच्या हातात येते.

१.१४ आदिवासी क्षेत्र असेल तर आदिवासी स्वशासनाच्या कायद्यामुळे पंचायत किंवा गट ग्रामपंचायतीच्या तथाकथित ग्रामसभेला मिळालेले सर्व अधिकार या ग्रामदानी गावाच्या खऱ्या ग्रामसभेला आपोआपच मिळतात. पण त्यातील दोष चिकटत नाहीत. उलट गाव व ग्रामसभेची व्याख्या बरोबर न केल्याचा त्यातील प्रमुख दोष दूर होतो.

## २. संधी

ग्रामदानी कायद्यात तरतूद नसली तरी त्यामुळे पुढील गोष्टी स्वयंनिर्णयाने करण्याची संधी प्राप्त होते -

२.१ गावातील ७५% शेतकऱ्यांनी जमीन दान करण्याचा संकल्प केला तरी ग्रामदान होऊ शकते. पण असे करू नये. त्यामुळे २५% लोकांवर निर्णय लादल्या जाऊन सर्वसहमतीने निर्णय घेणारी जिवंत शक्तिशाली ग्रामसभा निर्माण होण्यात अडचण निर्माण होते. गावातील १००% लोक संकल्प करणार नाहीत, तोपर्यंत कायद्याने शक्य असले तरी ग्रामदान घडवून आणू नये. धीर धरावा.

२.२ १००% लोकांची सहमती झाल्यावर, जरी जमिनीच्या खात्यात कुटुंबांतील स्त्रियांची नावे नसली तरी, संकल्पपत्र तयार करताना त्यावर कुटुंबातील सर्व स्त्री-पुरुष मतदारांची नावे लिहून सह्या घ्याव्या.

२.३ गावाशी संबंधित सर्व निर्णय ग्रामसभेत सर्वसहमतीनेच होतील असा स्वयंनिर्णय ग्रामसभेने घेतल्यास गावातील सर्वांत दुर्बल घटक अशा गरीब, दलित, आदिवासी व स्त्रियांना निर्णय-प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी प्राप्त होते.

२.४ कोरमकरता एकूण महिला मतदारांच्या ५०% महिलांच्या उपस्थितीची अट ठेवल्यास गावाच्या निर्णय-प्रक्रियेत महिला दबावगट म्हणून प्रभावी कार्य करू शकतात.

२.५ गाव ३०० लोकसंख्येपेक्षा मोठे असल्यास प्रत्येकी २०० ते ३००

लोकसंख्येच्या नैसर्गिक भागांच्या स्वतंत्र ग्रामसभा बनवाव्या व अशा ग्रामसभा किंवा मोहल्ला (किंवा पाडा/टोला/वाडा/तांडा) सभांच्या स्त्री-पुरुष प्रतिनिधींचे मिळून ग्रामदानी कायद्याप्रमाणे ग्रामदान बनवावे.

२.६ प्रत्येक ग्रामसभा किंवा मोहल्ला सभेकरता एक अभ्यासमंडळ गठित करावे. ग्रामसभेतील ज्या सदस्यांना अभ्यासाची आवड आहे, अशांचे स्वेच्छेने गठित केलेले मंडळ म्हणजे अभ्यासमंडळ. यात निर्णय होणार नाहीत, फक्त अभ्यास करण्यात येईल. अभ्यासमंडळ बंदिस्त असणार नाही. ते सार्वजनिक जागी नियमित बसणारे, सर्वांसाठी खुले असलेले मंडळ असेल.

२.७ एकापेक्षा जास्त ग्रामसभा असलेले मोठे गाव असल्यास ग्रामसभा-निहाय अभ्यासमंडळांचे प्रतिनिधी मिळून गावाचे अभ्यासमंडळ बनेल.

२.८ निर्णय घेणाऱ्या ग्रामसभेत तिचे सदस्य नसलेल्या बाहेरच्या व्यक्तीला भाग घेता येणार नाही.

२.९ गावातील झगडा-भांडण गावातच मिटवू असा ठराव ग्रामसभेने सर्वसहमतीने केल्यास न्यायव्यवस्थाही गावाच्याच हातात राहते. ज्या गुन्ह्यात शारीरिक दंड असणार नाही, अशाच गुन्ह्यांचा न्याय ग्रामसभेत होऊ शकेल व दंडाची रक्कम ग्रामकोषात जमा होईल, ही अट मान्य करावी लागेल.

२.१० संपूर्ण गावाचे दहा-दहा जणांचे बचत गट बनवून त्या गटांच्या नावाने बँकेत खाते काढून सहा महिने नियमित बचत केल्यास कर्ज मिळविण्याची, ते नीट वापरण्याची व स्वतःचा चिरस्थायी आर्थिक विकास स्वतःच घडवून आणण्याची क्षमता वाढीला लागते.

२.११ ग्रामसभेमार्फत 'ग्रामीणांच्या सहभागातून वनव्यवस्थापन' किंवा 'ग्रामवन', 'ग्राम-परिसर विकास कार्यक्रम' व 'सर्वंकष एकात्मिक पाणलोट-क्षेत्र विकास' हे शासकीय कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेतल्यास चिरस्थायी विकासाची गाव-स्तरीय प्रक्रिया व गावाचे नैसर्गिक संसाधनांवरील नियंत्रण अधिक प्रभावी होऊ शकते.

– ३ –

# ग्रामसभा सशक्तीकरण कायद्याचा एक मसुदा

स्वशासनाच्या दिशने वाटचाल करणारी संघटित व सक्रिय गावे स्वत:ला महाराष्ट्र ग्रामदान कायदा लागू करून घेऊ शकतातच. महाराष्ट्र सरकारने सर्वच गावांतील ग्रामसभांना अधिकार देऊन सत्तेचे विकेंद्रीकरण करण्याची घोषणा केली आहे.

राज्य शासन याबाबतीत जर गंभीर असेल तर त्याने पुढे प्रस्तावित 'ग्रामसभा सशक्तीकरण अधिनियम' मंजूर करून त्याची अंमलबजावणी करावी.

स्वयंशासनाचा आधारभूत घटक बनू इच्छिणाऱ्या ३०० ते ५०० लोकसंख्येच्या गावसमाजाने स्वत:ला ग्रामसभा घोषित करून स्वत:साठी सर्वसहमतीने कायदे व नियम बनवावेत आणि त्यांची अंमलबजावणी करावी.

ग्रामसभांनी आपसात विचारविनिमय करून त्यांच्या-त्यांच्या अधिकारक्षेत्रातील जल, जंगल व जमिनीची सुनिश्चिती करावी व तसे समझोता समयालेख (मेमोरंडम ऑफ अंडरस्टँडिंग) तयार करून त्यावर सह्या कराव्या. ज्या गावांना त्यांच्या पातळीवर आपसात हा वाद सोडवणे शक्य होणार नाही, त्यांचा निर्णय १० गावांच्या पातळीवर व्हावा.

## प्रस्तावित मसुदा

### १. प्रस्तावना

अनुभवाने हे स्पष्ट झाले आहे की -

१.१ लोकशक्ती हीच मूळ आहे.

१.२ लोकशक्तीशिवाय राज्यशक्ती अपुरी आहे.

१.३ कायद्यामुळे लोकशक्ती प्रगट होते असे नाही. लोकशक्ती प्रगट होत असेल तर चांगला कायदा व नियम त्यातील अडथळे दूर करून लोकशक्ती-प्रगटीकरणाला प्रोत्साहन देण्याचे कार्य करू शकतात.

१.४ ही लोकशक्ती पायाभूत समाज-पातळीवर ग्रामसभेच्या माध्यमातून

प्रगट होते. ग्रामसभा सशक्त झाली तरच राज्यही सशक्त होईल.

१.५ या कामात लोकांनीच पुढाकार घेणे आवश्यक आहे. लोक या दिशेने एक पाऊल पुढे येत असतील तर शासनाने दोन पावले पुढे आले पाहिजे.

१.६ आपली ग्रामसभा स्थापन करायची किंवा नाही हा निर्णय पूर्णपणे लोकांचाच असेल.

हे लक्षात घेऊन लोकशक्ती-प्रगटीकरणाच्या दृष्टीने ग्रामसभा अधिक सुयोग्य व सशक्त करण्याकरता हा कायदा आहे. लोक स्वत: पुढे येऊन आपली ग्रामसभा स्थापन करीत असतील तर अशा परिस्थितीत राज्य शासनाची भूमिका काय असेल ते या कायद्याद्वारे स्पष्ट करण्यात येत आहे.

## २. व्याख्या

२.१ *ग्राम* - जवळजवळ राहणारा ३०० ते ५०० लोकसंख्या असलेला मनुष्यसमाज, मग तो ग्रामीण, आदिवासी किंवा शहरी भागात राहणारा असला तरी, या कायद्याच्या दृष्टीने ग्रामच आहे.

२.२ *ग्रामसभा* - ग्रामामध्ये राहणाऱ्या सर्व मतदार स्त्री-पुरुषांनी खालील निर्णय सर्वसहमतीने घेतल्यास त्या ग्रामची ग्रामसभा स्थापन होईल.

२.२.१ ग्रामाशी संबंधित सर्व निर्णय ग्रामसभेमध्ये सर्वसहमतीनेच घेण्यात येतील.

२.२.२ प्रत्येक कुटुंबातून किमान एक पुरुष व एक स्त्री मतदार प्रत्येक ग्रामसभेत सहभागी होणे अनिवार्य असेल. योग्य कारणाशिवाय गैरहजर राहणाऱ्याला काय दंड होईल व तो कसा वसूल करायचा हे ग्रामसभा ठरवेल.

२.२.३ ग्रामामधील सर्व मतदार आपल्या उत्पन्नाचा किमान ४० वा हिस्सा (२.५ टक्के) नगदी किंवा वस्तुरूपाने ग्रामकोषात जमा करतील. ग्रामसभा हे प्रमाण वाढवू शकेल, पण २.५ टक्के पेक्षा कमी करणार नाही.

२.२.४ ग्रामामध्ये कुणीही गरीब व बेरोजगार राहू नये आणि प्रत्येकाला न्याय मिळावा याकरता ग्रामसभा सतत कार्य करेल.

२.३ *मतदार* - १८ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त वय असलेली व्यक्ती.

## ३. ग्रामसभा स्थापन झाल्यास

३.१ त्या ग्रामसभेला स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा आपोआप प्राप्त होईल.

३.२ पंचायत राज-७३ व्या घटनादुरुस्तीद्वारे अनुसूची-११ मध्ये दिलेले ग्रामपंचायतीच्या अधिकारक्षेत्रातील सर्व विषय ग्रामसभेच्या अधिकार-क्षेत्रातही राहतील.

३.३ ग्रामाला लागून असलेले वन, मग ते आरक्षित किंवा संरक्षित असले तरी, भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम २८ प्रमाणे 'ग्रामवन' घोषित करून ग्रामसभेला हस्तांतरित करण्यात येईल. त्याच्या व्यवस्थापनाचे व उपयोगाचे नियम ग्रामसभा बनवेल. राज्य शासन याकरिता मार्गदर्शक सूचना देईल, पण अंतिम निर्णय ग्रामसभेचाच असेल.

३.४ राज्याच्या भूमि-अभिलेखांमध्ये ग्रामसभेच्या नावाने एकच खाते असेल. ग्रामसभेअंतर्गत भूमि-अभिलेख ठेवण्याचे, त्यांत वेळोवेळी फेरफार करण्याचे, भूमिधारकाला प्रमाणपत्र व दाखला देण्याचे, तसेच सात-बाराच्या प्रमाणित सत्यप्रती देण्याचे काम ग्रामसभाच करेल.

३.५ ग्रामसभा आपले पटवारी (तलाठी) व ग्रामसेवक स्वतःच नियुक्त करू शकेल किंवा त्यांच्याशिवायही किंवा पर्यायी व्यवस्था आखून कामकाज कसे चालवायचे ते ठरवू शकेल. लोकसंख्येच्या प्रमाणात पटवारी व ग्रामसेवकाच्या पगाराची त्या ग्रामाच्या वाट्याची रक्कम राज्य सरकार ग्रामसभेला देईल.

३.६ संपूर्ण गावाचे एकच रेशन कार्ड असेल. रेशन आणण्याची व ते वितरित करण्याची पद्धती ग्रामसभा ठरवेल. या कामासाठी ग्रामाच्या वाट्याची रक्कम राज्य सरकार ग्रामसभेला देईल.

३.७ राज्य व केंद्र शासनाला ग्रामामध्ये राहणाऱ्या सर्व व्यक्तींद्वारे देय असलेले सर्व कर ग्रामसभाच भरेल. ते त्या व्यक्तींकडून कसे वसूल करायचे याचे नियम व पद्धती ग्रामसभा ठरवेल.

३.८ पूर्व-प्राथमिक व प्राथमिक शिक्षणाकरिता निर्धारित, ग्रामाच्या वाट्याची रक्कम राज्य व केंद्र सरकार सरळ ग्रामसभेला देतील. पूर्व-प्राथमिक व प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था स्वतः ग्रामसभा करेल.

३.९ विकास-कामांसाठी ग्रामाच्या वाट्याची रक्कम राज्य व केंद्र सरकार सरळ ग्रामसभेला देतील. आपल्या विकासाचे नियोजन व अंमलबजावणी स्वतः ग्रामसभा करेल.

३.१० ग्रामसभेचा आपला ग्रामकोष असेल व त्याचे व्यवस्थापन कसे करायचे याचे नियम ग्रामसभाच ठरवेल.

३.११ ग्रामसभेचा कुणीही स्थायी अध्यक्ष असणार नाही. प्रत्येक बैठकीत त्यावेळेपुरती अध्यक्षाची निवड करण्यात येईल.

३.१२ ग्रामसभेच्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याकरता एक कार्यकारी समिती असू शकेल, जिला स्वतंत्रपणे निर्णय घेण्याचा अधिकार असणार नाही. सर्व निर्णय ग्रामसभेतच होतील.

३.१३ ग्रामसभेबाहेरच्या कुणालाही – मग ते राज्य किंवा केंद्र शासन असले तरी – ग्रामसभा-अधिकारक्षेत्राचे आत काही करावयाचे असल्यास त्याकरता ग्रामसभेची मंजुरी आवश्यक असेल.

३.१४ ग्रामसभा आपल्या क्षेत्रात न्यायव्यवस्थेकरताही जबाबदार असेल. दोषी व्यक्तीकडून ती दंडही वसूल करू शकेल. त्यासंबंधीचे नियम ग्रामसभा स्वतःच तयार करेल.

३.१५ राज्य सरकार प्रोत्साहन म्हणून प्रत्येक ग्रामसभेला एक टेलिफोन कनेक्शन, संगणक (काम्प्युटर), प्रिंटर, इंटरनेट कनेक्शनसह देईल. मेंटेनन्स व बील भरण्याची जबाबदारी ग्रामसभेची असेल, ज्याकरता राज्य शासन लोकसंख्येच्या प्रमाणात एक निश्चित रक्कम ग्रामसभेला देईल. त्यापेक्षा जास्त खर्च झाल्यास तो ग्रामसभा आपल्या कोषातून करेल.

– ४ –

# स्वशासनाच्या दिशेने

*स्वशासन म्हणजे, आमच्या गावात व मोहल्यात आम्हीच सरकार !*
*त्यापुढे जगापर्यंत आमचे सरकार !!*

## आजची सांसदीय लोकशाही म्हणजे स्वशासन नव्हे

ग्रामपंचायतीपासून विधानसभा व लोकसभेपर्यंतचे शासन हे व्यक्तींच्या प्रतिनिधींचे शासन आहे. अठरा वर्षांवरील प्रत्येक व्यक्तीला आपले मत देऊन पाच वर्षांत एक वेळ आपला प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार तर आहे, पण पुढे पाच वर्षे त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार मात्र नाही. आजच्या लोकशाहीची इमारत सहभागी समाजाच्या मजबूत पायावर उभारलेली नसून ती वाळूच्या कणांसारख्या विखुरलेल्या व्यक्तींच्या आधारावर बांधण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यामुळे ही लोकशाही दुबळी, धनदांडग्यांच्या ताब्यात राहणारी आणि कोणतीही मूलभूत समस्या सोडविण्यास असमर्थ असल्याचे आतापर्यंतच्या अनुभवावरून स्पष्ट झाले आहे.

स्वशासनासाठी 'आम्हीच सरकार' हा पायाभूत सहभागी सामाजिक घटक अत्यावश्यक आहे. अधिक स्पष्टतेसाठी 'आम्हीच' व 'आमचे' यामधील फरक समजून घ्यावा लागेल.

## 'आम्हीच सरकार' आणि 'आमचे सरकार'

जिथे जवळपास राहणारे अठरा वर्षांवरील सर्व स्त्री-पुरुष एकत्र बसून सर्वसहमतीने निर्णय घेऊ शकतात, अशा सर्वांत मोठ्या पायाभूत राजकीय घटकात - उदाहरणार्थ, ज्याची एकूण लोकसंख्या २०० पेक्षा कमी व ५०० पेक्षा जास्त नाही असे गाव, मोहल्ला, टोला, पाडा, चाळ, आळी, वाडी, तांडा, हाऊसिंग कॉलनी इ. (जर लोकसंख्या ५०० पेक्षा जास्त झाली तर त्या घटकाचे विभाजन होऊन दोन घटक बनतील.) - 'आम्हीच सरकार' अशी रचना बनू शकते.

जिथे सर्वांनी एकत्र बसून निर्णय घेणे, मोठी संख्या आणि निवासस्थानां-

मधील जास्त अंतर यामुळे शक्य नाही, तिथे 'आम्हीच सरकार'च्या प्रतिनिधींचे मिळून बनलेले सरकार, म्हणजे आमचे सरकार.

## पायाभूत कायदा

अ) गाव किंवा मोहल्ल्यात काय करायचे ते 'आम्हीच सरकार' म्हणजे अठरा वर्षांवरील सर्व स्त्री-पुरुष एकत्र बसून ग्रामसभेत किंवा मोहल्लासभेत सर्वसहमतीनेच ठरवतील.

ब) जर 'आमच्या प्रतिनिधींनी बनलेल्या आमच्या सरकार'ला गाव किंवा मोहल्ल्याच्या हद्दीत काही करायचे असेल तर त्यासाठी ग्राम किंवा मोहल्ला सभेची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक असेल.

स्वशासनाकरता ही रचना व कार्यपद्धती, मग ते क्षेत्र आदिवासी असो की गैरआदिवासी, ग्रामीण असो की शहरी, एकसारखीच आवश्यक आहे. या विधानाशी आपण सहमत असाल तर या निकषावर आदिवासी स्वशासनाच्या केंद्रीय कायद्याचे मूल्यांकन करू या.

## आदिवासी स्वशासन कायद्यातील ग्रामसभा

या कायद्याच्या कलम ख) आणि ग) मध्ये गाव व ग्रामसभेची व्याख्या केली आहे, ती अशी -

ख) गाव म्हणजे, एक समुदाय जेथे वसला आहे अशी वस्ती किंवा वस्त्यांचा समूह किंवा पाडा किंवा पाड्यांचा समूह, जो परंपरा व प्रथांनुसार आपला कारभार सांभाळीत असेल.

ग) प्रत्येक गावात एक ग्रामसभा असेल, जिच्यात गावपातळीवर पंचायत निवडणुकीसाठी तयार केलेल्या मतदार यादीत नाव असलेल्या व्यक्तींचा समावेश असेल.

इथे गावाची व्याख्या फारच अस्पष्ट आणि ठिसूळ पद्धतीने केली आहे, ज्यामुळे राज्य शासनांना आपल्या सोयीनुसार व्याख्या करण्याची किंवा जुनीच व्याख्या कायम ठेवण्याची संधी मिळाली आहे. जर गावाची व्याख्याच चूक असेल तर त्याआधारे बनणारी ग्रामसभाही चूक असेल.

उदाहरणार्थ - महाराष्ट्र राज्य शासनाने या अस्पष्टतेचा फायदा घेऊन गावाची जुनीच व्याख्या नवीन कायद्यातही कायम ठेवली आहे. परिणाम -

* या व्याख्येनुसार अनेक गावे मिळून बनलेल्या गट ग्रामपंचायतीलाही एक गाव मानून त्यातील सर्व मतदारांची मिळून बनणारी सभा म्हणजे ग्रामसभा असे म्हटले आहे. त्यामुळे ग्रामसभा याआधी जशा होत्या तशाच मोठ्या व निष्क्रिय राहिल्या आहेत. या ग्रामसभा त्यांच्या सदोष रचनेमुळे आजपर्यंत कधीही सक्रिय व परिणामकारक होऊ शकल्या नाहीत व पुढेही होण्याची शक्यता नाही.

* एकाच जागी वसलेल्या काही मोठ्या गावांची लोकसंख्या २ ते ३ हजार पर्यंतही आहे. शासकीय व्याख्येप्रमाणे या गावाचीही एकच ग्रामसभा असेल. खूप मोठ्या संख्येमुळे सर्व स्त्री-पुरुषांनी एकत्र बसून सर्वसहमतीने निर्णय घेण्याकरता ही मोठी ग्रामसभा पूर्णपणे असमर्थ असेल.

मोठ्या गावात मोहल्ला, टोला किंवा पाडा सभांना ग्रामसभा-समकक्ष मानून संपूर्ण मोठ्या गावाकरता या मोहल्ला सभांच्या प्रतिनिधींच्या सभेची तरतूद असणे आवश्यक होते.

## पहिले पाऊल

केंद्र किंवा राज्य सरकारच्या कायद्यात तरतूद नसली तरी खऱ्या ग्राम किंवा मोहल्ला सभा स्वनिर्णयाने 'आम्हीच सरकार' बनून स्वशासनाच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकू शकतात. पण त्यासाठी त्यांना खालील गोष्टींची आवश्यकता असेल -

१) गाव किंवा मोहल्ल्याशी संबंधित सर्व बाबींवर ग्राम किंवा मोहल्ला सभेतच सर्वसहमतीनेच निर्णय घेण्याचा स्वयंनिर्णय.

२) फक्त शांतिमय पद्धतीनेच संघर्ष करण्याचा संकल्प. योग्य मुद्द्यांवर संघर्षात सर्वांची जेलमध्ये जाण्याची किंवा मरणाची तयारी. विरोधकांना शिव्या देणार नाही, दगड मारणार नाही किंवा त्यांच्या 'मुर्दाबाद'ची घोषणा देणार नाही, या निर्णयाची दृढतेने अंमलबजावणी.

३) दारूबंदी - गाव किंवा मोहल्ल्यात दारू काढून किंवा बाहेरून आणून

विकण्याची आणि खरेदी करून पिण्याची पूर्ण बंदी. दारू पिऊन ग्राम किंवा मोहल्लासभेत येण्यास किंवा घरात अथवा बाहेर गडबड करण्यास बंदी. नियम तोडणाऱ्यास ग्राम किंवा मोहल्लासभेद्वारा दंडाची तरतूद करून प्रभावी अंमलबजावणी.

४) सर्व संबंधित मुद्द्यांवर सतत अभ्यास करणारे गावाचे अभ्यासमंडळ. ज्यात गाव किंवा मोहल्ल्याशी संबंधित निर्णय घ्यायचे नसून फक्त अभ्यास म्हणजे कीस काढण्याचे काम तेवढे करायचे आहे, या स्पष्टतेसह कार्य.

५) 'आम्हीच सरकार' कडून 'आमच्या सरकार'च्या योग्य कायदे व कार्यक्रमांना पूर्ण सहयोग आणि चूक कायदे आणि कार्यक्रमांना असहयोग.

- ५ -

## मेंढा गावाची कहाणी

सुमारे १९९० च्या सुमारासची गोष्ट आहे. गडचिरोली जिल्ह्यात सर्वोदयी विचारवंत श्री. ठाकुरदासजी बंग यांची ग्रामस्वराज्य यात्रा येऊन गेली. भारत सरकारचे तत्कालीन आदिवासी आयुक्त डॉ. ब्रह्मदेव शर्मा यांचेसोबत जिल्ह्यातील आदिवासी भागात सक्रिय कार्यकर्त्यांच्या सहयोग बैठका दर ३-४ महिन्यांनी सुरूच होत्या. हिंदीत एक सर्वोदयी घोषणा आहे - 'गांव गांव में हो सरकार, बांटो दिल्ली के अधिकार !' तिचे गोंडीत रूपांतर झाले - 'मावा नाटे मावा सरकार' - 'आमच्या गावात आमचे सरकार !' लोकांना घोषणा आवडली. चर्चेबरोबर पसरत चालली.

जिल्ह्याच्या आतील दुर्गम भागात वीस आदिवासी गावांच्या प्रतिनिधींची बैठक सुरू होती. 'आमच्या गावात आमचे सरकार'वर चर्चा सुरू झाली. एक निरक्षर, लंगोटीधारी गोंड म्हातारा उभा झाला. त्याने कार्यकर्त्यांना गोंडीत प्रश्न विचारला - "आमच्या गावात आमचे सरकार, तर मग आमच्या गावातील आमचे सरकार आणि दिल्ली-मुंबईतील आमचे सरकार यामध्ये काय फरक ? दोन्हीही आमचेच, म्हणजे सारखेच नाही झाले काय ?" म्हातारा अडाणी दिसत होता, तरी त्याचा प्रश्न साधा नव्हता. कार्यकर्त्यांपुढे मोठाच पेंच निर्माण झाला. दिल्ली-मुंबईतील आमचे सरकार आमचे नाही म्हणावे, तर म्हातारा

विचारणार - आम्हीच त्यांना निवडून देतो; मग ते आमचे कसे नाही ? आमचेच म्हणावे, तर फरक सांगता येईना. सर्वसाधारणत: आपले अज्ञान झाकण्यासाठी जी युक्ती कार्यकर्ते व नेते करतात तीच युक्ती याही कार्यकर्त्यांनी केली. त्यांनी उलट त्या म्हाताऱ्यालाच प्रश्न विचारला, व म्हटले की आता तूच याचे उत्तर दे ! म्हातारा तयारीनेच आला होता. तो म्हणाला - ''दिल्ली-मुंबईत आमचे सरकार, हे बरोबर आहे. पण 'आमच्या गावात आमचे सरकार' म्हणता, हे काही बरोबर नाही. आमच्या गावात आमचे सरकार नको, तर आम्हीच सरकार असायला पाहिजे.'' हे त्याने म्हणायचाच अवकाश की सर्व एकदम बोलले - ''खरं आहे ! खरं आहे !'' त्यांनी घोषणा दुरुस्त करून घेतली.

मेंढा (लेखा) गावातील लोकांनी ही घोषणा पकडली. तिचा आशय समजून घेण्यासाठी अभ्यासमंडळात चर्चा सुरू झाली. दिल्लीची लोकसभा, मुंबईची विधानसभा यापासून तर थेट गावाच्या ग्रामपंचायतीपर्यंत तपासणी करण्यात आली. महात्मा गांधी यांनी त्यांच्या 'हिंदस्वराज्य' पुस्तकातील 'इंग्लंडची स्थिती' प्रकरणात 'पार्लमेंटची माता' इंग्लंडच्या पार्लमेंटचे जे 'वांझोटी व वेश्या' या शब्दांनी वर्णन केले आहे, त्याचीच प्रचीती वर उल्लेखित सर्व प्रातिनिधिक रचनांबाबतीतही तपासणी करताना सर्वांना आली. पंतप्रधानांपासून तर सरपंचापर्यंत सर्व एकाच माळेचे मणी असल्याचा उलगडाही झाला. या सर्व राजकीय रचनांचा आधारभूत घटक (बेसिक युनिट) वाळूच्या कणांसारख्या विखुरलेल्या व्यक्ती आहेत, यातच त्या रचनांची अंगभूत कमजोरी आहे हेही लक्षात आले. आम्ही सर्वजण बसून चर्चा करू शकत नाही, निर्णय घेऊ शकत नाही, अशा गावाबाहेरील पातळींवर आम्ही आमचे प्रतिनिधी पाठवू, पण आमच्या गावात आम्ही सर्वांनी मिळून सर्वसहमतीने निर्णय घेतले व त्यांची अंमलबजावणी केली तरच 'वांझोटी व वेश्या' नसलेली आधारभूत राजकीय रचना अस्तित्वात येते हेही स्पष्ट झाले. ही घोषणा व महात्मा गांधी यांचे विचार माहीत नसतानाही मेंढा (लेखा) च्या गावकऱ्यांनी सर्व निर्णय ग्रामसभेतच सर्वसहमतीने घेण्याचा आधीपासूनच घेतलेला निर्णय किती योग्य आहे याची जाणीव सर्वांना झाली.

मेंढा (लेखा) - गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा तालुक्यात असलेले गोंड

आदिवासींचे इतर गावांसारखेच एक लहानसे गाव. एकूण ६५ घरे व लोकसंख्या ३३१ असलेले हे गाव गडचिरोली-धानोरा रस्त्यावर धानोरा या तालुक्याच्या गावापासून फक्त ३ कि. मी. अंतरावर वसलेले आहे. अनेक वर्षांपासून बाहेरील जगाशी सतत सहज संपर्कात असलेले हे गाव. काय या गावात लोकांचे आपापसात मतभेद आणि भांडणे नाहीत ? मतभेद आणि भांडणेही आहेत. गावात आर्थिक विषमता नाही काय ? ती सुद्धा आहे. काय गावात भूक, गरीबी आणि बेकारीची समस्या नाही ? आहे. या गावातील लोक त्या भागातील राजकीय पुढारी, ठेकेदार, व्यापारी, शासकीय कर्मचारी आणि धार्मिक प्रमुखांच्या संपर्कात येत नाहीत काय ? ते या सर्वांच्या संपर्कात येतात. या गावातील लोक नाटक, डंडार, टी. व्ही., व्हिडीओ, सिनेमा बघत नाहीत काय ? बघतात, काय या गावातील सर्व लोक एकदम निःस्वार्थी झाले आहेत ? असेही नाही. मग काय फरक आहे इतर गावे आणि या गावात ? वरील सर्व गोष्टी असूनही या गावाने स्वतः होऊन सर्वसहमतीने ठरविले आहे की गावाशी संबंधित सर्व निर्णय ग्रामसभेत सर्वसहमतीनेच घ्यायचे. गावाचा हा निर्णय हाच तो महत्त्वपूर्ण फरक आहे की ज्याने या गावाला आसपासच्या अन्य गावांपासून वेगळे करून एका वेगळ्याच स्तरावर नेऊन बसविले आहे.

गावातील सर्व प्रौढ स्त्री-पुरुषांची सभा म्हणजे ग्रामसभा असे हे मानतात. गावपाटलाने एक आवाज दिला तरी ही ग्रामसभा भरू शकते. सर्वसाधारणपणे ५०% उपस्थिती असते. जे ग्रामसभेत अनुपस्थित असतील त्यांनी ग्रामसभेचा निर्णय मान्य करायचाच आहे अशी सर्वमान्यता आहे. ऐकायचे सर्वांचे, पण करायचे तेच जे ग्रामसभा ठरवेल, असे ठरलेले आहे. ग्रामसभेत सर्व स्त्री-पुरुषांना आपले मत मांडण्याचा समान अधिकार आहे. निर्णय घेण्यासाठी ग्रामसभा व अभ्यास करण्यासाठी अभ्यासमंडळ अशा गावाच्या दोन स्वतंत्र रचना आहेत. अभ्यासमंडळात फक्त चर्चा करायची, निर्णय घ्यायचा नाही, असेही ठरलेले आहे. अभ्यासमंडळातील सहभाग पूर्णपणे ऐच्छिक आहे. अभ्यासमंडळात गावाबाहेरील व्यक्तीही सहभागी होऊ शकतात; पण ग्रामसभेत नव्हे.

अभ्यासमंडळातील चर्चेतून 'आमच्या गावात आम्हीच सरकार' ची

अधिक स्पष्टता झाल्यावर या गावाने सर्वप्रथम आपल्यातील दोष काय याचा शोध सुरू केला. हक्कांची लढाई लढायची असेल तर पहिले आपल्यातील दोष बघून ते दूर करायला पाहिजेत याचे भान गावाला होते. फळे, फुले, पाने किंवा मधासाठी आपल्यातीलच काही लोक बुडापासून मोठमोठी झाडे सहज तोडून टाकतात हे बरोबर नाही, असे लक्षात येताच ग्रामसभेत त्यावर चर्चा होऊन निर्णय घेण्यात आला की कोणीही असे करू नये. केल्यास १५० रु. दंड ग्रामसभेला द्यावा लागेल. त्याची कडक अंमलबजावणीही सुरू झाली. गोंड जनजातीत तशी पुरुषप्रधानच समाजव्यवस्था आहे. त्यामुळे सामूहिक निर्णयप्रक्रियेत स्त्रियांचा सहभाग एक तर नसतोच किंवा असला तरी अत्यल्प असतो. ग्रामसभेत स्त्रियांचा सहभाग कसा वाढेल याकरिता विचारपूर्वक प्रयत्न करण्यात आले. ग्रामसभेत नीट चर्चा होऊन निर्णय होण्याआड येणारी प्रमुख समस्या दारूची. सर्वसहमतीने गावातील दारूवर ग्रामसभेचे संपूर्ण नियंत्रण स्थापित करायला गावाला एक वर्षाचा कालावधी लागला. पण सर्वसहमतीने निर्णय व्हावा याकरिता वाट पाहण्याचा आवश्यक तो धीर गावाजवळ होता. 'गोटूल' ही गोंड आदिवासींची अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण अशी सांस्कृतिक रचना. निरोगी उत्तम नागरिक तयार करणारी अनौपचारिक शाळाच. पण फक्त तरुण मुले-मुली तिथे एकत्रित येतात, म्हणून विकृत गैर-आदिवासी समाजाच्या टीकेला बळी पडून तथाकथित सुधारणेच्या नावाखाली स्वतःच लोकांनी गोटूल मोडून टाकले होते. अभ्यासातून लोकांच्या लक्षात आले की गोटूल हे आपल्या सांस्कृतिक-सामाजिक संघटनेचे केंद्रही होते. हे कळताच 'गोटूल' ची पुन्हा स्थापना करण्याचा निर्णय ग्रामसभेने घेतला.

गावकऱ्यांचा जंगल हा जगण्याचा मुख्य आधार. गावहद्दीतील एकूण जमिनीपैकी ९१% जमीन वने. त्यावर लोकांचे परंपरागत निस्तार हक्क. सामूहिक मालकीच्या किंवा सरकारी जमिनीमधून जगण्याकरता आवश्यक अन्न, फळ, फूल, कंद, मूळ, पाने, जळण, शेती व घरासाठी इमारती लाकूड, कुंपण, मांडव इ. साठी लाकूड, तसेच बांबू, गवत इ. घेण्याचे जे परंपरागत अधिकार, त्यांना 'निस्तार हक्क' असे म्हणतात. हा भाग १९६० मध्ये भाषावार प्रांतरचनेमध्ये महाराष्ट्रात येण्याअगोदर सी.पी. अँड बेरार मध्ये होता. १९५०

मध्ये जमीनदाऱ्या नष्ट झाल्यावर राज्य सरकारने निस्तार चौकशी करून प्रत्येक गावाचे वेगवेगळे निस्तार पत्रक तयार केले व त्यांना पटवारी रेकॉर्ड मधील राजस्व कागदपत्राचा दर्जा दिला होता. गावहद्दीतील संपूर्ण जमिनीवर गावकऱ्यांचे निस्तार हक्क होते. पण पुढे या वनांचे व्यवस्थापन वन विभागाकडे देण्यात आले व त्यांनी सांगायला सुरुवात केली की तुमचे निस्तार हक्क नष्ट झालेत. त्यातून गार्ड व डफेदारांमार्फत वन विभागाच्या लुटीची अन्याय्य व्यवस्था उभी झाली. लोकांनीही हक्काची कास न धरता तात्पुरत्या सोयीसाठी तिच्यापुढे शरणागती पत्करली. अभ्यासातून लोकांनी या निस्तार हक्कांचाही शोध घेतला. कायद्याने निस्तार कायम आहे असे कळल्यावर अधिकृत कागदपत्रांच्या नकला मिळविण्यासाठी संघटित लढा दिला. गार्ड व पटवाऱ्याला एकत्रित बोलवून आपल्या निस्तार हक्काच्या जंगलाची प्रत्यक्ष सीमारेषा त्यांचेसोबत फिरून पाहून घेतली, व यापुढे निस्तारासाठी गार्डला धान्य, कोंबडे, बकरे किंवा पैसे इ. न देण्याचा निर्णय घेतला. कुणी दिल्यास तितकीच वस्तू किंवा पैसे ग्रामसभेतही जमा करावे लागतील, असा नियमही बनविला. हा ऐतिहासिक निर्णय गार्डला खास माणूस पाठवून कळविण्याची व्यवस्थाही करण्यात आली.

ग्रामसभेच्या माध्यमातून लोक गाव-पातळीवरील आपली राजकीय सत्ता आपल्या स्वतःच्या हातात कशी घेतात याचीही प्रचीती या प्रक्रियेत आली. "सत्ता भीक मागून मिळत नाही, ती लोकांनी हिसकावून हातात घ्यावी लागते, किंवा आपली सत्ता दुसऱ्याला समर्पित न करता राखावी लागते" असे सिद्धान्त म्हणून खूप ऐकले-वाचले होते, पण लोक ते कसे करतात याचे दर्शनही मेंढा (लेखा) गावात झाले. खूप चर्चा आणि विचाराअंती मेंढ्याच्या ग्रामसभेने आणखी एक ऐतिहासिक निर्णय घेतला. "गावाबाहेरील कोणालाही, मग ते केंद्र सरकार असो की राज्य सरकार, ठेकेदार असो की स्वयंसेवी संस्था, त्यांना गाव-हद्दीत काहीही करावयाचे असेल तर तसे त्यांना ग्रामसभेच्या पूर्वपरवानगीशिवाय करता येणार नाही. कुणी जबरदस्ती तसे करण्याचा प्रयत्न केल्यास संपूर्ण गाव जाऊन शांततामय मार्गाने, 'चिपको' आंदोलनाच्या पद्धीने ते काम बंद पाडेल." ग्रामसभेचा हा निर्णय फक्त घोषित करण्यात आला. ग्रामसभा ही गावाची सर्वोच्च लोकसभा असल्याने तिच्या निर्णयावर आणखी

कुणाची परवानगी मागण्याचा प्रश्नच नव्हता. निर्णय घेणे त्यामानाने सोपे होते, पण त्यावर अंमलबजावणी करणे तितकेच कठीण. परीक्षेची घडी लवकरच आली. गार्डने न विचारता सुरू केलेले जंगलातील विरळीकरणाचे (थिनींगचे) काम लोकांनी यशस्वीपणे बंद पाडले. पुढे सरपंच विरुद्ध गाव असा प्रसंग उभा झाला तेव्हाही दुसऱ्याला न मारता, शिव्याही न देता, स्वतः मरण्याची तयारी असलेल्या गाव-संघटनेने ग्रामसभेची पूर्वपरवानगी न घेता फोडलेली गिट्टी खुद्द सरपंचालाही नेऊ दिली नाही. सरपंचाला गावाने बनविले आहे, सरपंचाने गावाला नाही, याची आठवण देऊन सरपंचापेक्षा गाव मोठे आहे याची जाणीव सरपंचाला करून दिली.

गावाचे गोटूल बांधायचे ठरल्यावर ते गावहद्दीतील निस्तार हक्काच्या जंगलातून सागाचे लाकूड आणूनच बांधायचे, असेही ठरले. प्रश्न निस्तार हक्काचा असल्याने वन विभागाला अर्ज करून परवानगी मागण्याचा प्रश्नच नव्हता. सर्व गावकऱ्यांनी मिळून सागाची लाकडे आणून गावात गोटूल म्हणजे एक झोपडी बांधली. वन विभागाने ती लाकडे जप्त करून नेण्याचा प्रयत्न करून बघितला, पण गावकऱ्यांच्या शांततामय निर्धारासमोर ते टिकू शकले नाही. शेवटी त्यांनी सशस्त्र पोलिसांची मदत घेतली. गावातील लोकसंख्येपेक्षा जास्त सशस्त्र पोलीस वन विभागाच्या ताफ्यासह गावात येऊन दाखल झाले. पुरुष मंडळी घराघरातच राहिली. स्त्रियांनीच गोटूलजवळ एकत्र होऊन प्रसंगाचा सामना केला. आधीच ग्रामसभेत ठरल्याप्रमाणे त्यांनी पोलिसांना स्पष्ट सांगितले की "तुमच्या बंदुकीचा सामना आम्ही बंदुकीने करणार नाही. तुम्हाला दगड किंवा काठीनेही मारणार नाही. इतकेच काय, तुम्हाला आम्ही शिव्याही देणार नाही. पण एक गोष्ट मात्र पक्की लक्षात ठेवा. तुम्ही आमचे गोटूल उपटून लाकडे जप्त करून नेलीत तर आम्ही सर्व पुन्हा जंगलात जाऊ, पुन्हा सागाचीच लाकडे कापून आणू व पुन्हा आमचे गोटूल बांधू. तुम्ही जितक्या वेळा उपटून न्याल तितक्या वेळा आम्ही पुन्हा-पुन्हा बांधू. यानंतरही तुम्हाला न्यायचे असेल तर न्या !" तरी गोटूल तोडून लाकडे जप्त करून नेण्यात आली. लोकांनी बोलल्याप्रमाणे दोन दिवसांत पुन्हा गोटूल उभारले. या घटनेची प्रतिक्रिया ३२ गावांच्या धानोरा जमीनदारी इलाक्यात उमटली. इलाका बैठकीत लोक-संताप

प्रगट झाला. कोणी म्हणाले, मोर्चा काढू, कोणी म्हणाले धरणे देऊ, कोणी अर्ज व प्रतिनिधी मंडळाचा मवाळ प्रस्तावही समोर ठेवला. लोकांनी विचार केला, माशाची ताकद जशी पाण्यात, तसेच आमची ताकद गावात. कार्यक्रम गावातच करायचा असावा. त्यांनी विचार केला, मेंढा गावकऱ्यांचे काय चुकले ? त्यांनी परवानगी न मागता सागवानी लाकडे वापरून आपले गोटून बांधले हेच ना ? मग गावोगावी अशीच गोटुले बांधण्याचा कार्यक्रम घेऊ या. शेवटी सर्वानुमते ठरले - किती गावे तयार आहेत ? बारा गावे तयार झाली. ठरलेल्या एकाच दिवशी बाराही गावांनी आपल्या गावात सागाच्या लाकडांची गोटुले बांधून उभी केली. एक गोटून उपटले तर बारा तयार झाली, बारा उपटली तर किती होतील ? - याचे गणित शासनाला कळले. शासनाने पुन्हा गोटूलला हात लावला नाही.

पेपर मिल या भागातील सर्वांत मोठी आर्थिक शक्ती. शासनाने मेंढा गावाच्या निस्तार हक्काच्या जंगलातीलही बांबू अत्यल्प दरात पेपर मिलला अनेक वर्षांच्या लीजवर दिलेला. १९९१ मध्ये लीजची मुदत संपली. ग्रामसभेने राज्य शासनाच्या मुख्यमंत्र्यांना लेखी कळविले की "यापुढे आमच्या जंगलातील बांबू आम्हाला न विचारता पेपर मिलला देऊ नये. जबरदस्ती दिल्यास आम्ही तो कापू देणार नाही." तरी शासनाने पेपर मिलला निस्तार वनातील बांबूची लीज दिली. पण लोकांनी 'चिपको' पद्धतीने आंदोलन करून गेली तीन वर्षे पेपर मिलला बांबू कापू दिलेला नाही. अनेक आर्थिक प्रलोभने व सशस्त्र दबावांना तोंड देत ग्रामसभा अजूनही खंबीरपणे उभी आहे.

आदिवासींच्या विकासाच्या नावावर भरपूर पैसा येतो व खर्च होतो, पण तो प्रत्यक्ष लोकांपर्यंत मात्र पोहचत नाही. या समस्येवरही अभ्यास करण्यात आला. "आमच्या विकासासाठी आलेला पैसा सरळ ग्रामसभेला देण्यात यावा. गावात ते काम राबविण्याची जबाबदारी ग्रामसभा घेईल" असे ग्रामसभेने शासनाला कळविले. "पैसा ग्रामपंचायतीला देता येतो, ग्रामसभेला नाही" असे उत्तर देण्यात आले. लोकांनी, ग्रामपंचायत म्हणजे गाव नाही हे समजावण्याचा प्रयत्न केला. त्यावर "ग्रामसभेला कायद्याने मान्यता नाही" असे कारण पुढे करण्यात आले. लोकांनी विचारले, "मग तुम्ही स्वयंसेवी संस्थांना कसे पैसे

देता ?'' त्या संस्था रजिस्टर्ड आहेत असे उत्तर मिळाल्यावर ग्रामसभेने संपूर्ण मेंढा गावच रजिस्टर्ड करून घ्यायचे ठरविले. संस्थेची घटना तयार करण्याचे काम दोन महिने सुरू होते. गोंडी भाषेतून मोहल्ल्यामोहल्ल्यात चर्चा सुरू होती. संस्थेचे नाव 'गाव नियोजन व विकास परिषद, मेंढा (लेखा)' असे ठरविण्यात आले. कार्यक्षेत्र फक्त मेंढा (लेखा) हे एकच गाव. सर्व निर्णय घेण्याचा अधिकार फक्त ग्रामसभेलाच असेल. ग्रामसभा ठरवून देईल तेवढेच काम कार्यकारी मंडळ करेल. ग्रामसभा दर पौर्णिमेला दुपारी १२ वा. गावाच्या गोटूलमध्ये होईल. ग्रामसभेची नोटीस काढण्यात येणार नाही, कोणीच कोणाला बोलावणार नाही, असेही ठरले. कार्यकारी मंडळाची पदे अध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष अशी न ठेवता प्रत्यक्ष कामाप्रमाणे ठरविण्यात आली. त्यांची कामेही वाटून देण्यात आली. संयोजक - ग्रामसभेच्या वतीने सही करणे व कागदपत्र सांभाळणे. कारकून - लिखाणाचे काम. बँक खातेदार नं. १ व बँक खातेदार नं. २ - या दोघांच्या सहीने बँकेतील संस्थेचे खाते चालेल. पासबुकधारक - याच्याकडे बँकेचे पासबुक राहील व तो ते ग्रामसभा ठरवेल तेव्हाच देईल. खर्च करणार - ग्रामसभा ठरवेल त्याप्रमाणे हा खर्च करेल. हिशोबनिस - हा हिशोब लिहिण्याचे काम करेल. असे कार्यकारी मंडळ ठरले. सार्वजनिक संस्था नोंदणी अधिकाऱ्यांनी अशी घटना कायद्यात बसत नाही म्हणून प्रकरण निकालात काढले. ''बाप दाखव नाही तर श्राद्ध कर !'' च्या धर्तीवर ''कायदा दाखव किंवा नोंदणी कर'' पद्धतीने बराच लढा दिल्यावर शेवटी एकदाची संस्थेची घटना न बदलविता नोंदणी झाली. पण तोपर्यंत गाव रजिस्टर्ड झाल्यास विकासाचा पैसा सरळ ग्रामसभेला देतो म्हणणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांची बदली झाली होती.

बऱ्याच खटपटी आणि प्रयत्न केल्यानंतर एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाकडून गावाच्या संस्थेला गावाचा पिण्याचे पाणी व सिंचनाचा प्रकल्प आराखडा तयार करण्याकरिता सोळा हजार रुपये अनुदान मिळाले आहे. तुम्ही 'आमच्या गावात आम्हीच सरकार' म्हणता, मग बाहेरच्या सरकारचा पैसा तुमच्या गावाच्या विकासासाठी कां मागता व घेता ? - अशी हेटाळणी करण्याचाही काही जणांनी प्रयत्न केला. त्यावर ''आमची घोषणा फक्त

प्रगट झाला. कोणी म्हणाले, मोर्चा काढू, कोणी म्हणाले धरणे देऊ, कोणी अर्ज व प्रतिनिधी मंडळाचा मवाळ प्रस्तावही समोर ठेवला. लोकांनी विचार केला, माशाची ताकद जशी पाण्यात, तसेच आमची ताकद गावात. कार्यक्रम गावातच करायचा असावा. त्यांनी विचार केला, मेंढा गावकऱ्यांचे काय चुकले ? त्यांनी परवानगी न मागता सागवानी लाकडे वापरून आपले गोटून बांधले हेच ना ? मग गावोगावी अशीच गोटुले बांधण्याचा कार्यक्रम घेऊ या. शेवटी सर्वानुमते ठरले - किती गावे तयार आहेत ? बारा गावे तयार झाली. ठरलेल्या एकाच दिवशी बाराही गावांनी आपल्या गावात सागाच्या लाकडांची गोटुले बांधून उभी केली. एक गोटून उपटले तर बारा तयार झाली, बारा उपटली तर किती होतील ? - याचे गणित शासनाला कळले. शासनाने पुन्हा गोटूलला हात लावला नाही.

पेपर मिल या भागातील सर्वांत मोठी आर्थिक शक्ती. शासनाने मेंढा गावाच्या निस्तार हक्काच्या जंगलातीलही बांबू अत्यल्प दरात पेपर मिलला अनेक वर्षांच्या लीजवर दिलेला. १९९१ मध्ये लीजची मुदत संपली. ग्रामसभेने राज्य शासनाच्या मुख्यमंत्र्यांना लेखी कळविले की ''यापुढे आमच्या जंगलातील बांबू आम्हाला न विचारता पेपर मिलला देऊ नये. जबरदस्ती दिल्यास आम्ही तो कापू देणार नाही.'' तरी शासनाने पेपर मिलला निस्तार वनातील बांबूची लीज दिली. पण लोकांनी 'चिपको' पद्धतीने आंदोलन करून गेली तीन वर्षे पेपर मिलला बांबू कापू दिलेला नाही. अनेक आर्थिक प्रलोभने व सशस्त्र दबावांना तोंड देत ग्रामसभा अजूनही खंबीरपणे उभी आहे.

आदिवासींच्या विकासाच्या नावावर भरपूर पैसा येतो व खर्च होतो, पण तो प्रत्यक्ष लोकांपर्यंत मात्र पोहचत नाही. या समस्येवरही अभ्यास करण्यात आला. ''आमच्या विकासासाठी आलेला पैसा सरळ ग्रामसभेला देण्यात यावा. गावात ते काम राबविण्याची जबाबदारी ग्रामसभा घेईल'' असे ग्रामसभेने शासनाला कळविले. ''पैसा ग्रामपंचायतीला देता येतो, ग्रामसभेला नाही'' असे उत्तर देण्यात आले. लोकांनी, ग्रामपंचायत म्हणजे गाव नाही हे समजावण्याचा प्रयत्न केला. त्यावर ''ग्रामसभेला कायद्याने मान्यता नाही'' असे कारण पुढे करण्यात आले. लोकांनी विचारले, ''मग तुम्ही स्वयंसेवी संस्थांना कसे पैसे

देता ?'' त्या संस्था रजिस्टर्ड आहेत असे उत्तर मिळाल्यावर ग्रामसभेने संपूर्ण मेंढा गावच रजिस्टर्ड करून घ्यायचे ठरविले. संस्थेची घटना तयार करण्याचे काम दोन महिने सुरू होते. गोंडी भाषेतून मोहल्ल्यामोहल्ल्यात चर्चा सुरू होती. संस्थेचे नाव 'गाव नियोजन व विकास परिषद, मेंढा (लेखा)' असे ठरविण्यात आले. कार्यक्षेत्र फक्त मेंढा (लेखा) हे एकच गाव. सर्व निर्णय घेण्याचा अधिकार फक्त ग्रामसभेलाच असेल. ग्रामसभा ठरवून देईल तेवढेच काम कार्यकारी मंडळ करेल. ग्रामसभा दर पौर्णिमेला दुपारी १२ वा. गावाच्या गोटूलमध्ये होईल. ग्रामसभेची नोटीस काढण्यात येणार नाही, कोणीच कोणाला बोलावणार नाही, असेही ठरले. कार्यकारी मंडळाची पदे अध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष अशी न ठेवता प्रत्यक्ष कामाप्रमाणे ठरविण्यात आली. त्यांची कामेही वाटून देण्यात आली. संयोजक - ग्रामसभेच्या वतीने सही करणे व कागदपत्र सांभाळणे. कारकून - लिखाणाचे काम. बँक खातेदार नं. १ व बँक खातेदार नं. २ - या दोघांच्या सहीने बँकेतील संस्थेचे खाते चालेल. पासबुकधारक - याच्याकडे बँकेचे पासबुक राहील व तो ते ग्रामसभा ठरवेल तेव्हाच देईल. खर्च करणार - ग्रामसभा ठरवेल त्याप्रमाणे हा खर्च करेल. हिशोबनिस - हा हिशोब लिहिण्याचे काम करेल. असे कार्यकारी मंडळ ठरले. सार्वजनिक संस्था नोंदणी अधिकाऱ्यांनी अशी घटना कायद्यात बसत नाही म्हणून प्रकरण निकालात काढले. ''बाप दाखव नाही तर श्राद्ध कर !'' च्या धर्तीवर ''कायदा दाखव किंवा नोंदणी कर'' पद्धतीने बराच लढा दिल्यावर शेवटी एकदाची संस्थेची घटना न बदलविता नोंदणी झाली. पण तोपर्यंत गाव रजिस्टर्ड झाल्यास विकासाचा पैसा सरळ ग्रामसभेला देतो म्हणणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांची बदली झाली होती.

बऱ्याच खटपटी आणि प्रयत्न केल्यानंतर एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाकडून गावाच्या संस्थेला गावाचा पिण्याचे पाणी व सिंचनाचा प्रकल्प आराखडा तयार करण्याकरिता सोळा हजार रुपये अनुदान मिळाले आहे. तुम्ही 'आमच्या गावात आम्हीच सरकार' म्हणता, मग बाहेरच्या सरकारचा पैसा तुमच्या गावाच्या विकासासाठी कां मागता व घेता ? - अशी हेटाळणी करण्याचाही काही जणांनी प्रयत्न केला. त्यावर ''आमची घोषणा फक्त

'आमच्या गावात आम्हीच सरकार' अशी नाही, तर त्याआधी 'गावाबाहेर - म्हणजे दिल्ली-मुंबईत - आमचे सरकार' असा अर्धा भागही आहे. याचाच अर्थ, दिल्ली-मुंबईतील सरकार आमचेच असल्याने त्यांचा पैसाही आमचाच आहे. आमच्या हिश्शाचा पैसा आम्हाला मिळून त्याचा योग्य उपयोग होतो की नाही हे बघणे हेही आमचे कर्तव्यच आहे'', या शब्दांत लोकांनी त्यांना चोख उत्तर देऊन गप्प बसवले.

भ्रष्टाचारावरतीही ग्रामसभेने चोख उपाय शोधून काढले आहेत. त्यांनी ठरावच करून टाकला आहे की - ''जो जितके पैसे मागेल तितके त्याला द्यायला काहीच हरकत नाही. फक्त त्या पैशाची पावती मात्र घेतली पाहिजे एवढीच अट आहे. पावती न घेता कुणी पैसे दिले तर त्याने तितकेच पैसे ग्रामसभेतही जमा करावेत.'' हे झाले पैसे द्यायचे असतात तेव्हा होणाऱ्या भ्रष्टाचाराबद्दल. जेव्हा पैसे घ्यायचे असतात तेव्हाही कर्मचारी निरनिराळ्या युक्त्या करून गावकऱ्यांना फसवतात. त्यावर त्यांचा उपाय आहे - एकएकट्याने जाऊन पैसे घ्यायचे नाहीत. ग्रामसभेत प्रथम कशाचे पैसे आहेत, किती आहेत, मस्टर बरोबर आहे किंवा नाही इ. ची सविस्तर चौकशी व तपासणी झाल्यावरच पैशाचे वाटप करण्यात यावे असा दंडक आहे. एकदा दुष्काळ पडून पिकांचे नुकसान झाले म्हणून शासनातर्फे नुकसानभरपाईची रक्कम शेतकऱ्यांना वाटप करण्याकरिता तालुक्याचे पर्यवेक्षक त्यांचे मस्टर घेऊन गावात आले व लोकांनी लवकर लवकर पैसे घेऊन जावे म्हणून घाई करू लागले. लोकांनी त्यांना बसवून ठेवून गाव जमा केले. मस्टरची तपासणी झाली. तेव्हा लक्षात आले की त्यांनी डुप्लिकेट मस्टर तयार केले असून ते सही एकावर घेत आहेत व दुसऱ्या मस्टरवरील आकडा दाखवून पेमेंट करीत आहेत ! या प्रकारे ५०० च्या ऐवजी २५० व ४०० ऐवजी २०० असे वाटप करणे सुरू होते. आता या भ्रष्ट कर्मचाऱ्याचे काय करायचे, यावर ग्रामसभेत चर्चा सुरू झाली. कृषी पर्यवेक्षकांना दरदरून घाम फुटला. त्यांनी गावापुढे लोटांगणच घातले, माफी मागितली व आग्रह करू लागले की - ''तुम्ही तुमच्या गावातील भांडण गावातच मिटवता. कोर्टात जात नाही. माझी चूक झाली. माझी वर तक्रार करू नका. ग्रामसभा जो निर्णय घेईल तो मला मान्य आहे.'' ग्रामसभेने त्यांना ५००

रु. दंड ताबडतोब गावफंडात भरण्याची शिक्षा सुनावली व पुन्हा कुठेही असा भ्रष्टाचार करणार नाही अशी सर्वांसमक्ष शपथ घ्यायला लावली.

गावाने पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन अभ्यासाचा एक भाग म्हणून गावाला लागून असलेल्या लघु पाणलोट क्षेत्रात एक हजार पेक्षा जास्त गलीप्लग बांधले असून त्यांच्यापासून काय फायदे होत आहेत याचे निरीक्षण व अभ्यास सुरू आहे. गावाची सर्वंकष पाणलोट क्षेत्र विकास योजना तयार करून त्याची अंमलबजावणी करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. एक जैविक घटक (बायो-युनिट) म्हणून गावाच्या जंगलाचा अभ्यास करण्यासाठी बाहेरील अभ्यासक मित्रांसोबत मिळून मेंढा (लेखा) जंगल अभ्यास गटाची स्थापना करण्यात आली असून अभ्यासाचे काम सुरू आहे. गावाने आपल्या विकासाचे नियोजन स्वतःच करण्याचा निर्णय घेतला असून त्यासाठी त्याचे प्रयत्न सुरू आहेत.

गावाच्या अठराशे हेक्टर जंगलाचे संरक्षण करण्याकरिता गावकरी स्वतःच आळीपाळीने जंगलात गस्त घालतात. महाराष्ट्र राज्य शासनाचा 'ग्रामीणांच्या सहभागातून वन-व्यवस्थापन' हा कार्यक्रम उपयुक्त वाटून गावकऱ्यांनी वन विभागाच्या पाठीमागे लागून या गावाची निवड सदर कार्यक्रमासाठी करवून घेतली. ऑगस्ट १९९३ मध्ये गावातील सर्व घरे सदस्य असलेली 'वन संरक्षण समिती' स्थापन करण्यात आली.

गावात विरोधी पुढारीही आहे. ग्रामसभेत कोणताही मुद्दा चर्चेला आला की हा त्याला विरोध करणार, हे पक्के ठरलेले आहे. अभ्यासमंडळात हा अजिबात सहभागी होत नाही, पण ग्रामसभेत मात्र त्याचेच म्हणणे सर्वांनी मान्य करावे असा त्याचा आग्रह असतो. गावकरीही त्याला, तो विरोध करतो म्हणून, शत्रू समजत नाहीत. उलट ते त्याला सगळ्यात जवळचा मित्र समजतात. ते म्हणतात - ''याच्यामुळेच आमचे काही चुकणार असेल तर ते आम्हाला कळते.'' फक्त त्याने ग्रामसभेत येऊन बोलावे असा आग्रह मात्र असतो. इतर 'हो हो' करणारे होयबा एखादवेळेस नाही आलेत तरी चालतील, पण हा विरोधक सभेला आलाच पाहिजे असे त्यांचे म्हणणे असते. विरोधकालाही मित्र बनवणारी ही किमया फक्त सर्वसहमतीची निर्णय-प्रक्रिया जिथे आहे तिथेच होऊ शकते. बहुमताच्या निर्णय-प्रक्रियेत हे अशक्यच आहे.

मेंढा (लेखा) हे एक लहानसे आदिवासी गाव अत्यंत विषम परिस्थितीतही एकाकी लढत देत खंबीरपणे, स्वाभिमानाने उभे आहे. अनेकदा अपयश पचवून हळूहळू कां होईना, स्वतःची ताकद वाढवीतच चालले आहे. दोष फक्त व्यक्तीचेच नसतात, ते रचना व कार्यपद्धतींचेही असतात. मेंढा (लेखा) ची जी ताकद आहे ती गावाशी संबंधित सर्व निर्णय सर्वसहमतीने ग्रामसभेतच घेणाऱ्या महत्तम सहभागी राजकीय-सामाजिक रचना व कार्यपद्धतीची आहे यात शंका नाही.

मेंढा हे संपूर्ण आदिवासींचेच गाव असल्याने काही बाहेरील लोक सोपा निष्कर्ष काढतात की, "आदिवासींचा एकजिनसी (होमोजिनिअस) समाज असल्यामुळेच हे मेंढ्यात शक्य झाले आहे. जिथे असा समाज नाही तिथे हे शक्यच नाही. शहरात तर समाजच नसल्याने हे घडणे अशक्यच आहे." संपूर्ण आदिवासी लोकवस्ती असलेले मेंढा (लेखा) हे काही एकच गाव नाही. अशी अनेक गावे आहेत. मग अशा सर्व गावांमध्ये असेच कां घडत नाही ? याचाच अर्थ स्पष्ट आहे की मेंढ्यात फक्त आदिवासींचा एकजिनसी समाज आहे म्हणून असे घडलेले नाही. अन्यत्रही असे घडलेले आहे. ('स्वराज्याचा शोध' लेखात अशी काही उदाहरणे दिली आहेत.)

या सर्व उदाहरणांवरून दिसून येते की -

असे वागण्याची क्षमता विशिष्ट जाती, जमाती किंवा धर्म, शहरी किंवा ग्रामीण, यामुळे येत नाही, तर ही सर्वांमध्ये असलेली मानवी क्षमताच आहे, जी कुठेही प्रकट होऊ शकते.

या सर्व ठिकाणी लोकांनी, आपल्यासाठी दुसरे कुणीच काही करणार नाही, आपल्यासाठी आपल्यालाच करावे लागेल, हे समजून घेऊन सर्वसहमतीने निर्णय घेणारी ग्रामसभा किंवा मोहल्ला समिती निर्माण केली, व अशी महत्तम सहभागी रचना अस्तित्वात आली तेव्हाच वेगळी ताकद प्रकट झाली.

जशी देशात लोकसभा, राज्यात विधानसभा, तशीच गावात ग्रामसभा व मोहल्ल्यात मोहल्ला समिती आहे; पण अशी विधानसभा की जिचे मंत्रीमंडळ नाही, जिची निवडणूक होत नाही, जिचे अस्तित्व स्वयंसिद्ध आहे, जी स्वयंभू आहे. तिला कुणी बनविले नाही, त्यामुळे तिला कुणी मोडू सुद्धा शकत नाही.

अशी ग्रामसभा व मोहल्ला समिती हेच 'वेश्या व वांझ' नसलेल्या राजकीय व सामाजिक सांगाड्याचे पायाभूत घटक (बेसिक युनिट) आहेत. अशी जिवंत ग्रामसभा किंवा मोहल्ला समिती एखादे लहान राजस्व गाव, टोला, पाडा, मोहल्ला किंवा वॉर्डाचीही असू शकेल. आजच्या पंचायत राज मधील ग्रामपंचायतींची ग्रामसभा म्हणजे वर वर्णन केलेली ग्रामसभा नव्हे.

स्व-निर्णयाने सक्रिय झालेल्या अशा ग्रामसभा व मोहल्ला समित्यांची संख्या जसजशी वाढेल व त्या सातत्यपूर्वक काम करतील तेव्हा गरजेनुसार त्यांच्या प्रातिनिधिक रचनाही उभ्या राहतील, अशी आशा करू या. पण जेव्हा केव्हा ग्रामसभा व मोहल्ला समित्या आधारभूत घटक असलेली प्रातिनिधिक रचना उभी राहील तेव्हा ती 'वेश्या व वांझ' असणार नाही, व तिची ताकद व सौंदर्य काही औरच असेल एवढे मात्र निश्चित !

*(साम्ययोग, १६ सप्टेंबर १९९५ मधून)*

— ६ —

## सीड : समूह-जीवनाचे मंगल दर्शन

**- डॉ. उल्हास जाजू**

मनुष्य सामाजिक प्राणी आहे. समाजालाही एक स्वभाव असतो आणि त्यानुरूप कालप्रवाहासोबत तो विकसित होत असतो. क्रांतीची बीजे चारित्र्यवान समाजातच पेरली जाऊ शकतात. क्रांतिपूरक समाजाची लक्षणे काय असू शकतात, याचा शोध आम्हाला उदयपूर (राजस्थान) पासून ९० कि.मी. दूर असलेल्या सीड गावाला घेऊन गेला.

### संकल्पाची सिद्धी

१९७९ मध्ये गावातील पुरोहित श्री. रामेश्वरप्रसादजी यांच्या मार्गदर्शनाने गावाचा ग्रामदानाचा संकल्प साकार झाला. रावत समाजाचे हे गाव भिल्ल झाले, या अफवेने या संकल्पाला पहिले ग्रहण लागले. आसपासच्या रावत समाजाच्या लोकांनी सामाजिक बहिष्काराची धमकी दिली. ग्रामसभेने या बहिष्काराला आव्हान दिले. सुदैवाने गैरसमज दूर झाले आणि बहिष्काराची शक्यता टळली.

ग्रामदान जाहीर झाले तरी मार्गात अडथळे होतेच. ग्रामदान कायद्यानुसार जल-जंगल-जमिनीबाबतचे अधिकार ग्रामसभेला आपोआपच मिळायला हवेत. परंतु ते मिळवण्यासाठी सीडला ग्रामदान बोर्डाच्या मदतीने उच्च न्यायालयापर्यंत जावे लागले.

## स्थिती आणि व्यवस्था

सीड एक छोटेसे गाव आहे. अलग-अलग वस्त्यांमध्ये विखुरलेले. एकूण १३०० बिघे जमिनीत शेती होते. सरकार आणि ग्रामदान बोर्डाच्या विकास कार्यक्रमांतर्गत तीन उपसा सिंचन योजनांद्वारा २५० बिघे जमीन ओलिताखाली आणण्यात आली आहे. प्रत्येक कुटुंबाजवळ थोडीफार जमीन आहे. ५ बिघ्यांपासून ४० बिघ्यांपर्यंत. शेतीवर मजूर क्वचितच कोणी ठेवू शकतो. बव्हंशी शेती श्रमस्वावलंबनानेच होते. गावाला ८०० एकराचे जंगल आहे. ते अतिशय वाईट अवस्थेत होते. जळाऊ लाकूडफाटा आणि गुरांसाठी चारा, याखेरीज त्यापासून विशेष प्राप्ती नाही. चाऱ्याची कमतरता असल्यामुळे दुधाचा व्यवसाय केला जाऊ शकत नाही. केवळ घराची गरज भागवण्यापुरत्या गाई-म्हशी पाळल्या जातात. शेती स्वावलंबनाच्या दृष्टीने पर्याप्त नाही, जंगलाचा पुरेसा आधार नाही, अशा अवस्थेत रोख रकमेची गरज भागवण्यासाठी गहू-मका विकणे किंवा सावकाराकडून कर्ज घेणे, हे दोनच मार्ग आहेत. परिसरात काही उद्योग उभे राहतील या आशेत गावकरी आहेत.

संपूर्ण जमिनीची मालकी ग्रामसभेची आहे. प्रत्येक कुटुंब आपापली जमीन कसू शकते, परंतु गावाबाहेर विकू शकत नाही. प्रत्येक कुटुंबाने थोडीफार जमीन ग्रामसभेला दान दिली आहे. ही जमीन शेतकरी स्वत: कसतो आणि त्यापासून मिळणारे उत्पन्न ग्रामकोषात जमा करण्यासाठी ग्रामसभेला सुपूर्द करतो. याशिवाय प्रत्येकजण ग्रामकोषात २ किलो धान्य जमा करतो. त्या ग्रामकोषातून गरजूंना बिनव्याजी कर्ज मिळते.

जवळपास पूर्ण गाव रावत समाजाचे आहे. प्रत्येक वस्तीतून (फलां) एक प्रतिनिधी सर्वसंमतीने निवडला जातो. ग्रामसभेत सगळे प्रतिनिधी 'मनाव' पद्धतीने (योग्य व्यक्तीला राजी करून) सर्वसहमतीने मुखिया निवडतात. दर

तीन वर्षांनी मुखियाची निवड होते. एकदा मुखिया राहिलेली व्यक्ती पुन्हा त्या पदावर येऊ शकत नाही. ग्राम-कार्यकारिणीत दोन महिलाही आहेत. सध्या एक शिक्षित तरुण मुखिया आहे.

मुखियाजवळ जमिनीची कागदपत्रे असतात. निर्णय ग्रामसभेत घेतले जातात. न्यायदानही ग्रामसभा करते. ग्रामसभेचा निर्णय कोणी मानला नाही तर त्याविरुद्ध ग्रामसभा न्यायालयात जाते. कोणी सरळ न्यायालयात गेले तर कायद्यानुसार खटला ग्रामसभेकडे पाठवला जातो.

सरकारकडून मिळालेल्या विकास-निधीतून ग्रामसभेने जंगलाच्या सुरक्षिततेसाठी दगडाचे कुंपण तयार केले आहे. अर्धे जंगल जळाऊ लाकूडफाट्यासाठी आणि अर्धे चाऱ्यासाठी ठेवले आहे. त्यातून मोळी किंवा भारा डोक्यावर घेऊन यायला आडकाठी नाही, परंतु बैलगाडी भरून चारा किंवा लाकूड आणायचे असेल तर मुखियापाशी पैसे जमा करून त्याची परवानगी घ्यावी लागते.

उपसा सिंचन योजनांद्वारा पाणी गावाच्या अगदी टोकापर्यंत पाइपने पोचवले जाते. पाण्याच्या वाटपाबद्दल नियम बनवण्यात आले आहेत. दोन व्यक्ती या वाटपाकडे लक्ष देतात. नियमांचे उल्लंघन करणाऱ्याला दंड होतो.

मूर्तिपूजेचा प्रघात नाही. गोमातेलाच ईश्वर मानतात. बाकी ईश्वर तर आपल्या हृदयातच आहे, अशी श्रद्धा आहे. न्यायदानाच्या वेळी आरोपीला देवीकडे घेऊन जातात. त्याच्या हातात पाण्याने भरलेला घडा दिला जातो. पाणी सांडले तर व्यक्ती दोषी मानण्यात येते.

## गावाचा स्वभाव

सीड गावाचा स्वभाव खालील तथ्यांवरून स्पष्ट होतो -

१. व्यसनमुक्त, कोर्टमुक्त, शीलवान गाव.

२. सामूहिक सिंचन आणि जंगलाचे दक्षतापूर्वक व्यवस्थापन.

३. ग्रामकोषाची निर्मिती आणि गरजूंसाठी त्याचा उपयोग.

४. 'चुनाव' (निवडणूक) टाळून 'मनाव' (योग्य व्यक्तीला राजी करणे) पद्धतीने मुखियाची निवड.

५. सज्ञन व समर्थ व्यक्तींची निवड व त्यांचेद्वारा गावचा कारभार.

६. अनुभवी पिढीबद्दल आदर.

७. शिक्षित तरुणांवर कारभाराची जबाबदारी.

८. ईश्वराबद्दल मनात धाक आणि हृदयस्थ ईश्वराची संकल्पना.

## कायद्यानुसार प्राप्त अधिकार

या सगळ्याचा आधार आहे, ग्रामदान कायद्यानुसार सीडला प्राप्त झालेले अधिकार :

१. नैसर्गिक साधनसंपत्ती (जल-जंगल-जमीन) वर ग्रामसभेचा अधिकार.

२. न्यायदानाचा अधिकार

३. सरकारकडून प्राप्त विकास-निधीचा आपण ठरवलेल्या अग्रक्रमांनुसार खर्च करण्याचे स्वातंत्र्य.

४. व्यक्तिगत मालकीचे विसर्जन. जमीन विकण्याचा अधिकार समाप्त, परंतु जमीन कसण्याचे आणि त्यापासून मिळालेल्या उत्पादनांचा उपभोग करण्याचे स्वातंत्र्य अबाधित. परिणामी जमीन गावाबाहेर विकली जाऊन लोक कंगाल होण्याचे संकट टळले आणि पिढ्यान्‌पिढ्या अन्न-स्वावलंबन साधले जाण्यासाठी स्थायी आधार मिळाला.

## काही अनुकूलता

सामूहिकतेच्या दर्शनापाठीमागे असलेल्या काही अनुकूलतांकडेही डोळेझाक करता येणार नाही -

१. लहान गाव - त्यामुळे गावकऱ्यांमध्ये नित्य दैनंदिन संपर्क.

२. एकाच जातीचे गाव (रावत समाज), त्यामुळे समान धारणा व रीतिरिवाज.

३. प्रत्येक कुटुंब शेतकरी, म्हणून लाचार नाही.

४. श्रमस्वावलंबनावर आधारित समाजाचे गुण - आर्थिक समता (बऱ्याच प्रमाणात) आणि परस्परावलंबन - ही परिस्थितीचीच देणगी आहे. जमीन किमान ५ बिघे आणि जास्तीत जास्त ४० बिघे. म्हणजे फार विषमता नाही. त्यामुळे शोषण नाही; संघर्षही नाही.

५. जमीन आर्थिक स्वावलंबनाच्या दृष्टीने कमी आणि निसर्गाचा लहरीपणा, या कारणांमुळे अन्न-स्वावलंबन मुश्किलीने साधते. बाजारासाठी उत्पादन होत नाही - शेतीतून नाही किंवा दुग्धव्यवसायातूनही नाही. जंगलाचा ऱ्हास झालेला असल्यामुळे इंधन आणि चाऱ्याखेरीज त्यातून फारसे काही मिळत नाही. औद्योगिक विकासाच्या अभावी रोजगार उपलब्ध नाही. उच्च शिक्षणाच्या अभावी तरुण नोकरीचा विचारही करू शकत नाहीत.

पैसा हातात खेळत नसल्यामुळे परिस्थितिजन्य बाजारमुक्ती साधली गेली आहे. त्यातून श्रमस्वावलंबन आणि काटकसरीला प्रोत्साहन मिळते आणि दुसरीकडे 'लफंगा' पैसा गावात प्रवेश करू शकत नाही. पैशाच्या प्रवेशामुळे शोषण, विषमता आणि त्यातून संघर्ष निर्माण होण्याची शक्यता टळते.

## सुजाण नेतृत्व

सीडमधील समाजाची एकसंधता त्याच्या वैशिष्ट्यपूर्ण स्वभावाची देणगी आहे. श्री. रामेश्वरप्रसादजींसारख्या सुबुद्ध मार्गदर्शकाची भूमिका सामाजिक चारित्र्य-निर्मितीच्या या प्रक्रियेत महत्त्वाची आहे. गावकऱ्यांसोबत त्यांच्याप्रमाणेच जीवन जगणारे, पुरोहिताच्या भूमिकेत लोकग्राह्य व्यक्तिमत्व असलेले, आपले नेतृत्व न लादता ग्रामसभेच्या सहभागी कर्तृत्वाला चालना देणारे आणि प्रसिद्धीपासून दूर राहणारे रामेश्वरप्रसादजी म्हणजे या गावाची एक अनोखी देणगीच आहे.

यातूनच दारिद्र्याच्या वेदना असतानाही मंगल जीवन आकाराला आले आहे. *(अनुवादित) (साम्ययोग, १६ डिसेंबर १९९७ मधून)*

— ७ —

# सीडचा अनुभव : ग्रामस्वराज्याची उपयुक्तता स्पष्ट

**- अनिल अग्रवाल, सुनीता नारायण**

शिरगणतीच्या व्याख्यासूत्रानुसार भारतातील पंचाहत्तर टक्के खेड्यांत एक हजारपेक्षा कमी लोकवस्ती आहे. प्रत्येक लोकवस्तीसाठी कायदेशीररित्या स्थापन झालेली ग्रामसभा असावी, अशी आमची सूचना आहे. शिवाय प्रत्येक

खेड्यात अनेक वस्त्या किंवा वाड्या असतात हे लक्षात घेतले, तर अशा ग्रामसभेचा आकार निश्चितपणे आटोपशीर राहील.

गावातल्या विशेष प्रबळ लोकांचे वर्चस्व ग्रामसभेवर राहील, असा एक आक्षेप घेतला जातो. परंतु ग्रामसभा खुल्या बैठकीत निर्णय घेईल; तेव्हा एका गटाने वर्चस्व गाजवायचे किंवा गरीबांच्या हितसंबंधांकडे दुर्लक्ष करायचे, या प्रकारांना वाव नक्कीच कमी राहील. याउलट निवडून आल्याच्या जोरावर पंचायतीच्या मूठभर पुढाऱ्यांनी स्थानिक अधिकाऱ्यांशी संधान बांधून निर्णय घ्यायचे आणि सरकारी योजनांचे जे लाभ सर्व गावकऱ्यांच्या वाट्याला यायचे, त्यातला बव्हंश भाग या पंचायत-पुढाऱ्यांनी लाटायचा, हा प्रकार अधिक रास्त कसा म्हणता येईल?

नैसर्गिक संसाधनांची चांगली व्यवस्था ठेवणे आणि वस्ती-वस्तीतले मतभेद मिटविणे ही कामे निवडून आलेल्या पंचायतींपेक्षा सर्व गावकऱ्यांना खुल्या अशा मंचांच्या द्वारा पुष्कळच अधिक चांगल्या प्रकारे होऊ शकतील. हे खुले मंच योग्य रितीने अस्तित्वात आले आणि शासनाने त्यांना पुरेसे पाठबळ दिले, तर दारिद्र्य व विषमता असलेल्या सध्याच्या परिस्थितीतही हे खुले मंच चांगले कार्य करू शकतील. ज्या भागात विशेष विषमता आहे तेथे सध्या आहे या परिस्थितीत खुल्या मंचांच्या द्वारा समन्वय साध्य करण्यात जास्त अडचणी येतील, परंतु निर्णय घेण्याबाबत प्रत्येक गावकऱ्याला वाव देण्याची संकल्पना कार्यकारी ग्रामसभेमध्ये अभिप्रेत आहे आणि निवडणुकीच्या मार्गाने स्थापन होणाऱ्या पंचायत-संकल्पनेपेक्षा ती पुष्कळच अधिक चांगली ठरेल.

खेड्याच्या परिसराची व्यवस्था कार्यकारी ग्रामसभेमार्फत कशी पाहता येते, याचे उत्तम उदाहरण उदयपूरजवळच्या सीड खेड्यात मिळते. राजस्थान ग्रामदान कायदा (१९७१) अन्वये हे खेडे नोंदलेले आहे. ग्रामसभेला कार्यवाहीचे आणि कायदेकानूचे अधिकार देणारा देशातला हा एकमेव कायदा आहे. विनोबा भावे यांच्यापासून प्रेरणा घेऊन हा कायदा झालेला आहे. त्यानुसार कोणत्याही खेड्याला आपले गाव 'ग्रामदान खेडे' असल्याचे जाहीर करता येते. ते तसे अधिकृतपणे मान्य झाले की, तेथील ग्रामसभेला गावाच्या हद्दीतल्या नैसर्गिक संसाधनांची व्यवस्था पाहण्याचे अधिकार प्राप्त होतात. न्यायनिवाडा, खटला

भरणे, शिक्षा देणे हे अधिकारही त्या ग्रामसभेला मिळतात.

सीड हे 'ग्रामदान खेडे' म्हणून मान्य झाले असल्याने गावाच्या हद्दीतल्या सर्व जमिनींवर - पूर्वी सरकारी मालकी असलेल्या जमिनींसकट - ग्रामसभेचे पूर्ण नियंत्रण आहे आणि त्या जमिनींच्या वापराचाही संपूर्ण अधिकार तिला आहे. ग्रामसभेत गावातल्या सर्व प्रौढांचा समावेश आहे. गावाच्या सामुदायिक जमिनीच्या रक्षणासाठी ग्रामसभेने निश्चित नियम केले आहेत. जमीन-वापरासंबंधी सुस्पष्ट नियम करणारे असे देशातले हे एकमेव खेडे आमच्या पाहण्यात आहे.

सामुदायिक जमिनींचे दोन वर्ग केले आहेत - एका प्रकारच्या जमिनीत गुरे चारणे व पालापाचोळा गोळा करणे या दोहोंना मनाई आहे. दुसऱ्या प्रकारच्या जमिनीत गुरे चारण्यास मुभा आहे, पण पाचोळा गोळा करण्यास किंवा झाडांना इजा करण्यास बंदी आहे. पहिल्या प्रकारची जमीन हिरवीगार आणि गवताने दाट आच्छादलेली आहे. हे गवत गावकरी वर्षातून एकदाच कापतात. अरवली डोंगराच्या उघड्या-बोडख्या मुलखात या गावाचा हिरवागार पट्टा वाळवंटातल्या मरुद्यानासारखा (ओॲसिस) दिसतो. चार वर्षांपूर्वी अभूतपूर्व अवर्षण झाले, त्यावेळीही सीड खेड्याने बाजारात सुमारे पन्नास हजार रुपये किंमत येईल अशा ऐंशी बैलगाड्या भरून गवताचे पीक काढले होते. गावच्या सर्व कुटुंबांना हे गवत समन्याय पद्धतीने वाटून देण्यात आले.

खाजगी जमिनींवरची झाडे कापायला सीडची ग्रामसभा परवानगी देत नाही. त्यासाठी ग्रामसभेची पूर्वसंमती घ्यावी लागते आणि जमिनींच्या मालकाला विक्रीसाठी नव्हे, तर घरगुती कामासाठी लाकूड हवे असेल, तरच परवानगी दिली जाते. गावातल्या झाडांचा आणि चराऊ जमिनींचा वापर शिस्तशीर पद्धतीने व्हायला हवा. नियम मोडले तर दंड वगैरे शासन करण्याची पद्धत ग्रामसभेने ठरवली आहे. १९८० च्या नंतरच्या दशकाच्या सुरुवातीच्या काळात सीड हे 'ग्रामदान खेडे' झाले. पहिल्या काही वर्षांतच झाडे कापणे, मनाई असलेल्या भागात गुरे चारणे, इतकेच काय, झाडांची पाने-फांद्या ओरबाडणे वगैरे अपराधांबद्दल एकंदर जवळजवळ पाच हजार रु. दंड बसवून ग्रामसभेने तो वसूलही केला आहे. एका गरीब आदिवासी खेड्याच्या मानाने ही

रक्कम प्रचंडच आहे. सीड खेड्याच्या सामुदायिक जमिनीचा वापर आता आपल्याला करता येत नाही म्हणून शेजारच्या खेड्यातल्या लोकांना राग येतो. त्यांच्यापैकी काही जणांकडूनही सीड ग्रामसभेने वर उल्लेखिलेल्या अपराधांबद्दल दंड वसूल केला आहे.

गांधीजींची ग्रामस्वराज्याची कल्पना परिसराच्या नवनिर्माणासाठी किती उपयुक्त ठरू शकेल, हे सीडच्या अनुभवावरून स्पष्ट होते. प्रत्येक खेड्यात क्रियाशील असा सामूहिक मंच असावा आणि गावाची स्वतःची परिसर-व्यवस्था-पद्धत असावी. त्या पद्धतीनुसार सामुदायिक संसाधनांची वाढ व सुधारणा व्हावी आणि सर्वांना या संसाधनांपासून मिळणाऱ्या लाभाचा वाजवी वाटा मिळावा. या परिसर-व्यवस्थेचे नियंत्रण, व्यवस्थापन व वाटप त्या सामूहिक मंचाकडे असावे.

गेली पंधरा वर्षे भारतातील एकूण पर्यावरण-दृष्याचे निरीक्षण केल्यानंतर आमची अशी पक्की खात्री झाली आहे की, या संकल्पनेला दुसरा पर्याय नाही. खेड्यातले लोक वडाच्या पारावर एकत्र बसून आपल्या प्रश्नांची चर्चा करतील आणि हे प्रश्न सोडवण्याचे मार्ग शोधू लागतील, तेव्हाच अत्यंत सुबुद्ध असे निर्णय घेण्याच्या प्रक्रियेचा आरंभ होईल, हा आमचा विश्वास दिवसेंदिवस वाढत आहे. भारताच्या खेड्यांमध्ये सांस्कृतिक व जीवशास्त्रदृष्ट्या अतोनात विविधता आहे. तिला तितकीच तोड अशा विकेंद्रित स्वरूपाच्या निर्णय-पद्धतीच्या मार्गेच सापडू शकेल. दूरवर कुठेतरी केंद्राच्या किंवा राज्याच्या राजधानीच्या शहरात किंवा जिल्ह्याच्या मुख्य सरकारी कार्यालयात बंदिस्त खोल्यांत बसणारी मंडळी निव्वळ एकमार्गी (मोनोलिथिक) अर्थहीन निर्णय घेऊ शकतात. वास्तव स्थितीशी त्यांचा काहीही संदर्भ नसतो.

*('हिरव्या खेड्यांचा देश', परिसर प्रकाशन, पुणे मधून)*

दिल्ली मुंबईत <u>आमचे</u> सरकार !
आमच्या गावात <u>आम्हीच</u> सरकार !!

---

प्रकाशक : मोहन हिराबाई हिरालाल, संयोजक, 'वृक्षमित्र',
चिद्दरवार हॉस्पिटलजवळ, आर.टी.ओ. ऑफिस समोर,
रामनगर, चंद्रपूर - ४४२४०१
फोन : ०७१७२ - ५८१३४

मुद्रक : नीतिन तापस, श्याम ब्रदर्स, गणेशपेठ, नागपूर - १८

जून २००२ : प्रती ३०००